रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड गुरुवार । दि. २५ जून २०२६ । अंक १९ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## हुंडा मागणाऱ्या पाच जणांवर गुन्हा

**पनवेल :** साखरपुड्याचा सोहळा पार पडताच अभियंता असलेल्या वराने लग्नापूर्वी ५० लाख रुपये रोख हुंड्याची मागणी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी पाच जणांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. डोंबिवलीतील पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण उघडकीस आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डोंबिवली येथे राहणाऱ्या एका तरुणीचा विवाह मुंबईतील दादर (पश्चिम) येथील ३० वर्षीय इंजिनीयर (अभियंता) तरुणासोबत ठरला होता. अनुरूप विवाह संस्थेच्या संकेतस्थळावरील पान २ वर

## आ. अनिकेत तटकरेंचा शपथविधी सोहळा

**मुंबई :** मुंबई येथे पार पडलेल्या शपथविधी सोहळ्यात अनिकेत तटकरे यांनी महाराष्ट्र विधान परिषदेच्या आमदारपदाची शपथ घेतली. शपथविधीवेळी त्यांच्या कुटुंबीयांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. विविध मान्यवरांसह कुटुंबीयांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत अनिकेत तटकरे यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. शपथविधीनंतर परिसरात समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. आगामी काळात विकासकामे आणि जनतेच्या प्रश्नांवर प्रभावी काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केल्याचे सांगितले जाते.

# हलगर्जीपणाचा कहर



1 प्रशासनाचा नाकर्तेपणा उघड

2 बेलकडेमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान

3 पूल तुटल्याने विद्यार्थ्यांचे हाल

**उशिराने दाखल झालेल्या मान्सूनच्या सरींनी रायगडकरांना झोडपून काढले. विकास कामाचा सपाटा लावणाऱ्या सरकारचा आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणा पहिल्याच पावसात उघड झाला. अलिबाग तालुक्यात देहेन येथे अपूर्ण पूल आणि बंधारा वाहून गेल्याने गावाचा संपर्क तुटला. अलिबाग-रोहा रस्त्याला भेगा पडल्या, रस्त्याच्या भरावामुळे भातशेतीचे नुकसान, रस्त्यांवर येणाऱ्या मातीमुळे वाहने घसरून अपघात घडत आहेत. प्रशासन आणि ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळेच या घटना घडल्याचे आरोप स्थानिकांनी केले आहेत. रायगड किल्ला आणि कशेडी घाटात दरडी कोसळल्या असून अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने नुकसान झाले आहे.**

## वे|ध|क

### तुकाराम मुंढेंच्या बदलीसाठी २५० कोटी गोळा

**मुंबई :** तुकाराम मुंढे हे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यापासून हे खाते देशभरात चर्चेत आले आहे. सरकारनं या विभागाला गांभीर्याने घेतलेच नसल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तुकाराम मुंढे यांच्या बदलीसाठी इंटरनॅशनल ड्रग लॉबीकडून २५० कोटी रुपये गोळा केल्याची धक्कादायक माहिती जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत दिली. तुकाराम मुंढे यांची मोठी सुपारी घेण्यात आली आहे. २५० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. ड्रग्ज लॉबी, मेडिकल कंपन्या अशा अनेक एकत्र येऊन तुकाराम मुंढे यांच्या पाठीमागे लागलेले आहेत. पुढच्या आठवड्यात नावानिशी समोर आणणार असल्याचे आव्हाड म्हणाले.

## रेशन वितरण व्यवस्थेत बदल

**नवी दिल्ली :** रेशन धान्य घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक करण्यासाठी सरकार सातत्याने डिजिटल सुविधांवर भर देत आहे. सरकारने रेशन वितरण व्यवस्थेत बदल केला आहे. आता रेशन कार्डधारकांना आपलं संपूर्ण धान्य एकाच रेशन दुकानातून घेण्याची सक्ती असणार नाही. नागरिक कोणत्याही रेशन दुकानातून धान्य घेऊ शकतील. म्हणजेच एका दुकानातून गहू तर दुसऱ्या दुकानातून तांदूळ घेण्याची मुभा ग्राहकांना मिळणार आहे. या नवीन बदलामुळे बायोमेट्रिक मशीनमध्ये अंगठा न लागणे किंवा दुकानात धान्य उपलब्ध नसल्यामुळे संपूर्ण रेशन न मिळणे यांसारख्या त्रासापासून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## सिंधुदुर्गमध्ये भूकंप सदृश्य धक्के

**सिंधुदुर्ग :** कणकवली, फोंडाघाट, विद्यानगर-बेलदारवाडी परिसरात मंगळवारी (दि.२३) भूकंप सदृश्य धक्के जाणवले. या घटनेत ४ घरांच्या भिंतींना तडे गेले असून मोठ्या भेगा पडल्या. भूकंपाच्या धक्क्यांनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. या घटनेनंतर फोंडाघाटच्या सरपंच संजना आग्रे यांनी सकाळी संबंधित परिसराला भेट देऊन नुकसानग्रस्त घरांची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. मात्र हा भूकंप किती रिश्टर स्केलचा होता याबाबत माहिती समजू शकलेली नाही. नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार रात्री साडेअकराच्या आसपास धक्के जाणवले.

# व्यवस्थेने बुडवली शेती

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या अलिबाग-रोहा या एसआरडीसीच्या रस्ते प्रकल्पातील गंभीर हलगर्जीपणाचा फटका थेट शेतकऱ्यांना बसू लागला आहे. रस्त्याचा भराव करताना पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक असलेले पाईप न टाकल्याने बेलकडे येथे पावसाचे पाणी थेट शेतात घुसले असून पान २ वर



> **पाण्याच्या निचऱ्याची साधी व्यवस्था न केल्याने शेतकऱ्यांची उभी पिके अक्षरशः पाण्याखाली गेली असून लाखोंचे नुकसान झाले आहे. विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या या कामांमधील हलगर्जीपणामुळे शेतकरी उद्ध्वस्त होत असताना जबाबदार यंत्रणा मात्र अजूनही मौनात आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस दखल घेतली नाही. शेतकऱ्यांचे नुकसान वाढत असताना प्रशासनाची उदासीनता अधिकच चिड आणणारी ठरत आहे. तातडीने निचऱ्याची व्यवस्था, नुकसानग्रस्तांना भरपाई आणि जबाबदारांवर कारवाई न झाल्यास तीव्र लोक आंदोलन केले जाईल. – रुपेश पाटील, ग्रामस्थ, बेलकडे**

# देहेनचा संपर्क तुटला

**। जीवन पाटील ।**

**। भाकरवड ।**

अलिबाग तालुक्यातील भाकरवड देहेन येथे सुरू असलेल्या पुलाच्या कामातील उघड हलगर्जीपणा आणि नियोजनशून्य कारभारामुळे संपूर्ण देहेन गाव बाह्य जगापासून तुटल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळ्याच्या तोंडावर अपूर्ण ठेवलेले पुलाचे काम आणि वाहून गेलेला तात्पुरता बंधारा यामुळे गाव अक्षरशः कोंडीत सापडले आहे. पाण्याच्या वाढत्या प्रवाहात तात्पुरता बंधारा वाहून गेल्याने गावाकडे ये-जा पान २ वर

### तीन दिवस यलो अलर्ट

रायगड जिल्ह्यामध्ये पावसाने दमदारी एन्ट्री मारली आहे. कोरडी पडलेल्या धरणांसह नद्या पाण्याने प्रवाहीत झाल्या आहेत. जिल्ह्यामध्ये तीन दिवसांत यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटांसह वादळी वाऱ्याबरोबरच जोरदार, मध्यम, तुरळक स्वरुपात पाऊस पडणार आहे. काही भागांमध्ये सोसायट्याचा वारा प्रति तास ४० ते ५० किमी येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.

# किल्ले रायगड बंद!

## महादरवाजाजवळ दरड कोसळली

**। नाते । वार्ताहर ।**

अतिवृष्टीमुळे किल्ले रायगडावरील महादरवाजा परिसरातील पायरी मार्गावर दरड कोसळल्याने पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने किल्ल्यावर जाणारा पायरी मार्ग २४ व २५ जून २०२६ रोजी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी दिले आहेत. २३ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे महादरवाजा जवळील पायरी मार्गावर दरड कोसळून संपूर्ण मार्ग बंद झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरड हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, मार्ग सुरक्षित होईपर्यंत शिवभक्त आणि पर्यटकांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होऊ नये, म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. या ठिकाणी कोसळलेले दगड हटविण्यासाठी तातडीने काम हाती घेण्यात आले असून, पायरी मार्ग दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत किल्ल्यावर प्रवेश बंद राहणार आहे. स्थानिक पान २ वर



# कशेडी घाटात दरड कोसळली

## एकेरी वाहतूक सुरू



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटात चोळई गावाजवळ दगड-मातीची मोठी दरड कोसळल्याने प्रशासनाकडून तातडीने एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. हॉटेल अन्नपूर्णा ते चोळई दरम्यान सुमारे २ किलोमीटर अंतरावर वाहतूक नियंत्रित पद्धतीने सुरू ठेवण्यात आली आहे.

मुसळधार पावसामुळे घाटातील पान २ वर

# माथेरानमध्ये प्लास्टिक रेनकोट बंदीचे तीनतेरा

## पर्यटकांकडून सर्रास वापर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात पर्यावरण रक्षणासाठी नगरपरिषदेने प्लास्टिक यूज अँड थ्रो रेनकोटवर बंदी घातली असली तरी पहिल्याच पावसात या निर्णयाचे तीनतेरा वाजल्याचे चित्र समोर आले आहे. पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक रेनकोटचा वापर सुरूच असून, बंदी केवळ कागदावरच असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे.

पावसाळ्यात माथेरानमध्ये धुक्याचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होते. या वेळी अनेक पर्यटक



प्लास्टिक रेनकोट खरेदी करून त्याचाच वापर करतात आणि पावसाचा आनंद घेतल्यानंतर ते रेनकोट जंगलात किंवा रस्त्याच्या कडेला फेकून देतात. यामुळे संपूर्ण परिसरात प्लास्टिक कचरा पसरून अस्वच्छता निर्माण होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

नगरपरिषदेने १३ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या बैठकीत प्लास्टिक रेनकोटवर बंदीचा निर्णय घेतला होता. या निर्णयावर पर्यटन व नियोजन समितीने शिक्कामोर्तब केले होते. व्यापाऱ्यांसोबत बैठका घेऊन अंमलबजावणीची तयारीही दाखवण्यात आली होती.

मात्र प्रत्यक्षात पहिल्याच पावसात पर्यटकांकडून पान २ वर

# माती उत्खननावर वन विभागाची धाड

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वारे गावाच्या हद्दीतील फॉरेस्टलगत सर्व्हे क्रमांक १०६ या परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध माती उत्खननावर वन विभागाने मोठी कारवाई केली आहे. रात्री सुमारे एकच्या सुमारास वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून तीन डंपर आणि एक जेसीबी ताब्यात घेत जप्त केल्याची माहिती समोर आली आहे.

जप्त करण्यात आलेली वाहने



**■ तीन डंपर, एक जेसीबी जप्त; भूमाफियांविरोधात मोठी कारवाई**

वन विभागाच्या पोई येथील डेपोमध्ये जमा करण्यात आली असून या कारवाईमुळे पान२ वर

## ट्रेलरच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल शहराजवळील आई कृपा ढाबा परिसरात डेरवली कोळखे कट येथे पुणे-पनवेल जुन्या हायवेवर भीषण अपघात घडून एका महिलेचा मृत्यू झाला आहे. भरधाव ट्रेलरने स्कुटीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने स्कुटीवरील महिला गंभीर जखमी झाली. तसेच उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. मिळालेल्या पान २ वर




**रासायनिक फेसाने व्यापली नदी | उद्योगांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह**

# ‘कासाडी’ची पुन्हा एकदा ‘नासाडी’

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

तळोजा औद्योगिक वसाहतीतून वाहणारी कासाडी नदी पुन्हा एकदा प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असून नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात रासायनिक फेस पसरल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. राज्याच्या पावसाळी अधिवेशनात आ. प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २३) कासाडी नदीतील प्रदूषणाचा गंभीर मुद्दा उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले होते. मात्र त्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी नदीत मोठ्या प्रमाणात फेस दिसून आल्याने प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित उद्योगांच्या



भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कासाडी नदीतील प्रदूषण हा काही नवीन विषय नसून गेल्या अनेक वर्षांपासून औद्योगिक सांडपाण्यामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. नदीचे पाणी काळवंडणे, दुर्गंधी पसरणे, जलचरांचा मृत्यू आणि पाण्यावर रासायनिक थर तयार होणे या घटना वारंवार घडत आहेत. मात्र यावेळी नदीवर पसरलेल्या पान २ वर

> कासाडी नदीतील पाण्याचे नमुने आम्ही घेतले आहेत. फेस येण्याचा घडलेला प्रकार हा नैसर्गिक आहे कि, रसायनिक घटकामुळे हा प्रकार घडला, याचा शोध आम्ही घेत आहोत. – विक्रांत भालेराव, अधिकारी. महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ

# ‘दिबां’साठी अन्नपाणी त्याग!

## रश्मिता पोपेटा यांचे आमरण उपोषण




। पनवेल । प्रतिनिधी ।

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव देण्यासंबंधी राज्य व केंद्र सरकारने दिरंगाई सुरु ठेवली आहे. त्यांच्या निषेधार्थ रिल्स स्टार रश्मिता पोपेटा या तरुणीने विमानतळ रोडवरील चिंचपाडा पुलाखाली आमरण उपोषण सुरु केले आहे.

पहिल्याच दिवशी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या सोबत प्रत्येक आंदोलनात सहभागी होत आलेल्या कोल्हापूरच्या रणरागिणी भारतीताई पोवार यांनी रश्मिताच्या आंदोलनाला भेट दिली. त्यांनी राश्मिताला धीराने आंदोलन पुढे नेण्याचा आशीर्वाद दिला आहे. त्यांच्यासोबत कामगार नेते, रायगड जिल्हा काँग्रेसचे नेते महेंद्र घरत होते. सकाळपासून विविध संघटना, त्यांचे पदाधिकारी आंदोलनस्थळी उपस्थित राहून पाठिंबा देत आहेत.

सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, दहा गाव समितीचे अध्यक्ष सचिन केणी, भीम सैनिक भाई जगदीश गायकवाड, माजी उपसरपंच अमर पाटील, नरेश पाटील पदाधिकारी संदीप नाईक, बाळाराम नाईक, विवेक मोकल, सुधीर कोळी, सुनील नाईक, विनोद भोईर, पंकज मुंडकर, श्रीधर पाटील, सत्यवान म्हात्रे, सुहास पाटील, रवींद्र म्हात्रे, रोहन पाटील, दिपेश पोपेटा, निखिल भापी, नरेश पाटील, गुरुनाथ म्हात्रे, संदीप गोसावी, महेंद्र नाईक, वासुदेव पाटील, रघू म्हात्रे, प्रकाश पाटील, किरण करावकर, हनुमंत खंडाले, राजेश पाटील, संदीप गोसावी, स्वप्निल मुंडे, मंथन पाटील, आदित्य पाटील, जय पाटील, मनीष पाटील, विनायक म्हात्रे, सुनील पाटील, पारस पाटील, महेंद्र भोईर, रितेश पाटील, शिवम पाटील, ज्ञानेश्वर पाटील, कवी नारायण तारेकर, रोशन पाटील, मोतीराम गोंधळी आदींनी सरकार आणि स्थानिक राजकीय नेत्यांविरोधात रोष व्यक्त केला.

### आयव बरसली!

रश्मिता पोपेटा हिला पाठिंबा देण्यासाठी कोल्हीकोपर येथील द्रौपदाबाई म्हात्रे (आयव) उपस्थित होत्या. आयवने पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उद्योजक गौतम अदाणी यांचा आगरी भाषेत खरपूस समाचार घेतला. आयवचे भाषण ऐकण्याकरिता अनेक जण उपस्थित होते. याशिवाय सोनारी (उरण) येथील हितेंद्र कडू या गायकाने गाणी गाऊन उपोषणकर्त्यांचा उत्साह वाढविला.

स्थानिक राजकीय नेते, राज्य व केंद्र सरकार तसेच भारतीय जनता पार्टीच्या पोटभरू नेत्यांवर विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तोफ डागली. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांचा राजीनामा कुठे आहे? उरणचे आमदार महेश बालदी यांनी जाळून घेतले का? बेलापूरच्या आमदार मंदा पाटील केवळ आश्वासने देत आहेत. वनमंत्री गणेश नाईक हे सरकारची तळी उचलून समाजाचे मारेकरी ठरत आहेत, असा उद्वेग अनेक तरुणांनी आपल्या भाषणांतून व्यक्त केला.

### आगरी समाजातील संघटना उसळल्या!

लोकनेते दि. बा. पाटील यांचे विमानतळाला नाव देण्यासाठी रश्मिता पोपेटाने सुरु केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देत आगरी समाज, बहुजन समाज, संपूर्ण ओबीसी समाजासह इतर संघटनाही आक्रमक झाल्याने आंदोलन पुढे अधिक उग्र करण्यासाठी बैठकाही सुरु आहेत. राज्य व केंद्र सरकारची नाकाबंदी करण्यासाठी काही व्युहरचना आखल्या जात आहेत. स्थानिक आमदारांच्या सभागृहात लक्ष्यवेधी विचारण्याच्या भूमिकेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. ही नौटंकी बंद करा आणि समाजाशी प्रामाणिक असाल तर रोह्याचे सुपुत्र सी. डी. देशमुख यांनी तत्कालीन पंतप्रधान नेहरू यांच्याकडे राजीनामा देऊन बाहेर पडले, तसा दोन्ही आमदारांनी राजीनामा द्यावा. मंदा म्हात्रे आणि गणेश नाईक यांनीही राजीनामा द्यावा, असा आक्रोश तरुण करीत आहेत.

### शनिवारी रास्ता रोको आंदोलन

रश्मिता पोपेटा यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्यासाठी पुकारलेल्या आमरण उपोषणाला संपूर्ण पाठिंबा आहे.दोन दिवसात सरकारने यासंबंधी उचित निर्णय न घेतल्यास येणाऱ्या शनिवारी सकाळी ११ वाजता उग्र स्वरूपात, सर्व ताकदीनिशी आंदोलन करणार असा इशारा भिवंडीचे खासदार सुरेश ऊर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांनी दिला. रश्मिता पोपेटा विमानतळाला दिबांचे नाव देण्यासाठी विमानतळ रोडवर चिंचपाडा येथे उपोषणास बसली आहे. तिला पाठिंबा देण्यासाठी खासदार आले होते. यावेळी उरणच्या नगराध्यक्ष भावना घाणेकर, उरण सामाजिक संघटनेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, युवा नेते रुपेश पाटील, मनसेचे प्रवक्ते योगेश चिले, आगरी युवा नेते सर्वेश तरे, नवी मुंबई भूमिपुत्र संघटनेचे अध्यक्ष निलेश पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस संतोष घरत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

## व्यवस्थेने बुडवली शेती

अनेक एकर शेती जलमय झाली आहे. दरम्यान, प्रशासनाच्या एका चुकीमुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फिरल्याची संतप्त प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात वर्षानुवर्षे पावसाचे पाणी नैसर्गिक ओढे आणि नाल्यांमधून कोणत्याही अडथळ्याशिवाय वाहत होते. मात्र रस्त्याचा भराव उंचावताना पाण्याच्या प्रवाहाचा कोणताही तांत्रिक विचार करण्यात आला नाही. निचऱ्यासाठी आवश्यक पाईप किंवा जलवाहिन्या न टाकल्याने पावसाचे पाणी अक्षरशः अडवण्यात आले आणि त्याचा संपूर्ण प्रवाह शेतांकडे वळला. त्यामुळे भातशेतीसह इतर पिके पाण्याखाली गेली असून अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.विशेष म्हणजे, स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांनी याबाबत संबंधित यंत्रणेला यापूर्वीच संभाव्य धोक्याची कल्पना दिल्याचा दावा केला आहे. मात्र अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. कोट्यवधींच्या कामात निचऱ्यासारख्या मूलभूत बाबीकडे दुर्लक्ष कसे झाले, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.एका बाजूला शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे धडे दिले जातात, तर दुसऱ्या बाजूला सरकारी यंत्रणांच्या निष्काळजी कारभारामुळे त्याच शेतकऱ्यांची उभी पिके पाण्याखाली जात आहेत. विकासाच्या नावाखाली जर शेतीच उद्ध्वस्त होत असेल, तर अशा विकासाचा फायदा नेमका कोणाला, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.परिणामी, संपूर्ण प्रकाराची चौकशी करून संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर जबाबदारी निश्चित करावी, तातडीने पाण्याच्या निचऱ्यासाठी आवश्यक पाईप टाकावेत, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

**अधिकारी, ठेकेदाराचे दुर्लक्ष**

विशेष म्हणजे, काम सुरू असतानाच स्थानिकांनी आणि शेतकऱ्यांनी संभाव्य धोक्याबाबत वारंवार इशारे दिले होते. पावसाळ्यापूर्वी निचऱ्याची व्यवस्था करण्याची मागणीही करण्यात आली होती. मात्र संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांनी या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे ही नैसर्गिक आपत्ती नसून प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ओढवलेले संकट असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## कशेडी घाटात दरड कोसळली

डोंगरभागातून लाल माती व दगडांचे ढिगारे रस्त्यावर कोसळू लागल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. चौपदरीकरणाच्या कामादरम्यान डोंगराचा मोठा भाग कापण्यात आल्यामुळे या परिसरात दरड कोसळण्याचा धोका सातत्याने वाढत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, जुन्या महामार्गावरील भोगाव हद्दीतील डेंजर झोनमध्येही परिस्थिती चिंताजनक आहे. जय भारत ठेकेदार कंपनीकडून सुरू असलेल्या रस्ते कामादरम्यान प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात खडी टाकून मार्ग तयार करण्यात आला असला तरी या ठिकाणी मोठमोठे दगड रस्त्यावर येत असल्याने दरड कोसळण्याचा धोका कायम आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या भागात गॅबियन संरक्षक जाळी बसवण्यात आली असली तरी सततच्या पावसामुळे डोंगराची अस्थिरता कायम आहे. त्यामुळे अधिक ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.या भागात मोठी दरड कोसळल्यास मुंबईगोवा महामार्ग पूर्णपणे बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पावसाळा सुरू होऊनही डेंजर झोनमधील काम अपूर्ण असल्याने स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## देहेनचा संपर्क तुटला

पूर्णपणे बंद झाली आहे. पर्यायी मार्ग नसल्याने शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, दुग्धव्यवसायिक आणि रोजंदारीवर अवलंबून असलेले नागरिक अक्षरशः अडकून पडले आहेत. दैनंदिन जीवन ठप्प झाले असून ग्रामस्थांचा संयम संपत चालल्याचे चित्र आहे. स्थानिकांचा थेट आरोप आहे की, प्रशासन आणि ठेकेदार यांच्या निष्काळजीपणामुळे हे संकट ओढवले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी काम पूर्ण करणे अपेक्षित असतानाही पुलाचे काम अपूर्ण अवस्थेत ठेवण्यात आले. परिणामी, पावसाच्या पहिल्याच जोरात गावाचा संपर्क तुटला आणि संपूर्ण यंत्रणा अपयशी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

देहेन-भाकरवड परिसरात धरमतर खाडीच्या भरतीचे पाणी आणि नदीचा प्रवाह यांचा वर्षानुवर्षांचा धोका आहे. तरीही याकडे दुर्लक्ष करून अपूर्ण काम रेटल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. दरम्यान, धोका माहित असूनही डोळेझाक करून काम केलं गेलं अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

१९८९ आलेल्या महापुरात देहेन व भाकरवड या दोन्ही गावात वीस ते पंचवीस फुट पाणी शिरले होते. त्यामुळे गेल कंपनी प्रशासनाला वेळोवेळी अर्ज करुन पाण्याचा निचरा योग्य तो होईल अशा परिस्थितीत काम करण्याची विनंती केली होती. तसेच रस्त्यालगत चालू असलेले काम जर पूर्ण झाले व पूर्ववत पाणी जाण्याचा मार्ग बंद झाला तर पाण्याचा वेढा पूर्ण गावाला घेऊन गावाचे व येथील गोरगरीब शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होईल, याची माहिती ग्रामस्थ मंडळ भाकरवडचे अध्यक्ष शंकर बाळू पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली होती. मात्र त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. गावात विद्यार्थ्यांचे शिक्षण, दूध व शेतीमालाची वाहतूक, आरोग्यसेवा यावर गंभीर परिणाम झाला असून परिस्थिती अधिक बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिणामी, गावाचा संपर्क तुटण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. तसेच तातडीने पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अपूर्ण पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे आणि जबाबदार अधिकारी, ठेकेदारांवर कारवाई करावी, अशी तीव्र मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा गावात तीव्र आंदोलन उभे राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## किल्ले रायगड बंद!

प्रशासनाने पर्यटकांना आणि शिवभक्तांना या कालावधीत पायरी मार्गाचा वापर न करण्याचे आवाहन केले आहे.दरम्यान, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी हा आदेश जारी केला असून, आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षकांना नाणे दरवाजा, चित्त दरवाजा आणि किल्ला परिसरात बंदोबस्त ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. येत्या २७ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा होणार असून, या पार्श्वभूमीवर किल्ले रायगड बंद राहिल्याने शिवभक्तांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने परिस्थिती लवकर पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत

## माथेरानमध्ये प्लास्टिक रेनकोट बंदीचे तीनतेरा

मोठ्या प्रमाणात प्लास्टिक रेनकोट वापरले जात असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, हे रेनकोट पर्यटकांनी बाहेरून आणले नसून माथेरानमधीलच विक्रेत्यांकडून खरेदी केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे बंदी असूनही विक्री सुरू असल्याने पालिकेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी व्यापाऱ्यांवर नियंत्रण नसल्याचा आरोप करत प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. पर्यटकांकडून फेकले जाणारे प्लास्टिक रेनकोट जागोजागी साचल्याने जंगल परिसरात कचऱ्याचे साम्राज्य वाढले आहे. पर्यावरणपूरक पर्यटनाच्या दृष्टीने घेतलेला निर्णय प्रभावीपणे राबवला जात नसल्याने माथेरानच्या स्वच्छतेवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत आहेत. आता पालिका या प्रकारावर ठोस कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ट्रेलरच्या धडकेने महिलेचा मृत्यू

माहितीनुसार, सुगंधा भगत या स्कुटीवरून पनवेलच्या दिशेने जात असताना मागून आलेल्या भरधाव ट्रेलरने त्यांच्या वाहनाला धडक दिली. धडकेनंतर त्या रस्त्यावर कोसळल्या आणि ट्रेलरचे चाक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले; मात्र त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माती उत्खननावर वन विभागाची धाड

परिसरातील अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. वारे परिसरात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर माती उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होत्या.

कर्जत तालुक्यात गेल्या काही काळात माती उत्खनन आणि वाहतुकीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत असून, रात्री उशिरापर्यंत डंपरची वर्दळ सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे पर्यावरणाची हानी, रस्त्यांचे नुकसान तसेच स्थानिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

वन विभागाचे आरएफओ निलेश भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. संबंधित प्रकरणी पुढील चौकशी सुरू असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. स्थानिक नागरिकांनीही अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती संबंधित विभागांना देऊन सहकार्य करण्याचे आवाहन हे करण्यात येत आहे.

## ‘कासाडी’ची पुन्हा एकदा ‘नासाडी’

फेसामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

स्थानिकांच्या आरोपानुसार, काही रासायनिक कारखान्यांकडून प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नदीत सोडले जात आहे. त्यामुळे पावसाळ्यात नदीचे पाणी फेसाळून पर्यावरणासाठी गंभीर धोका निर्माण होत आहे. विशेष म्हणजे अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाल्यानंतरही परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी नदीतील प्रदूषण अधिकच उघड झाल्याने यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी कासाडी नदीतील प्रदूषणासाठी जबाबदार उद्योगांची तातडीने चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच नदीतील पाण्याचे नमुने तपासून फेस निर्माण होण्यामागील नेमके कारण जाहीर करावे, अशीही मागणी होत आहे.

## हुंडा मागणाऱ्या पाच जणांवर गुन्हा

ओळखीतून हा विवाह निश्चित करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. २० जून रोजी पनवेलजवळील शेडुंग फाटा परिसरातील शिल्प रिसॉर्ट येथे साखरपुडा आणि हळदी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी साखरपुड्याचा कार्यक्रम पार पडताच वराने वधूच्या मावशीकडे लग्नापूर्वी ५० लाख रुपये रोख देण्याची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. वधूपक्षाने वर आणि त्याच्या कुटुंबीयांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी मागणीवर ठाम राहत वधूपक्षाला शिवीगाळ केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या वधूपक्षाने कार्यक्रमस्थळ सोडून डोंबिवली गाठली. त्यानंतर डोंबिवली पोलीस ठाण्यात ऑनलाइन तक्रार दाखल करण्यात आली.

प्राथमिक नोंदीनंतर हे प्रकरण पुढील तपासासाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले. पीडित तरुणीच्या तक्रारीवरून अभियंता वरासह त्याच्या कुटुंबातील चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोणे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

### ई-निविदा सूचना

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-३०, टी-३१, टी-३२, टी-३३, टी-३४, टी-३५, टी-३६ आणि टी-३७ (२०२६-२७ 3rd Call) अशा एकुण **आठ** निवीदा महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या e-Tender च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. २५.०६.२०२६ पासून ते दि. ०१.०७.२०२६ @ १३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. ०१.०७.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल. **(सही)**

**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वावळोली ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक सौ. ज्योती महेंद्र ठाकूर यांचेकडुन विकत घेण्याची ठरवलेली आहे.

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| १६/१ | ०.४६.६० | ७.८० |
| १६/२ | ०.२६.८० | ४.७० |
| १६/३ | ०.२५.३० | ४.४५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदर जाहिर नोटीसी प्रसिद्ध केल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत दाखल न झालेस सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक : २४/०६/२०२६

**ॲड. ऋषीकेश अनिल कांबळे**
बी.ए.एल.एल.बी.
नेरळ, कुंभार आळी, जिल्हा परिषद शाळेसमोर,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९५६१७३४३७७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १)संदिप गोपाळ वैद्य, २) राघव गोपाळ वैद्य, ३) स्मिता सिद्धकुमार देशपांडे, ४) विवेक यशवंत रणदिवे, ५)निखिल अजित रणदिवे, ६) अलिशा अजित रणदिवे, ७) मिहीर शशिकांत वैद्य, ८)शाम शशिकांत वैद्य, ९) सुजित दुर्गाप्रसाद माथुर, १०) रणजित दुर्गाप्रसाद माथुर, ११)मिलिंद शरतकुमार प्रधान, १२)सुनिल शरतकुमार प्रधान १३) अजय शरतकुमार प्रधान, १४) सिद्धार्थ सुभाष सत्याणकर, १५)सत्यजित सुभाष सत्याणकर, यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**- मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| परहूरपाडा ता.अलिबाग | ९८ | जिरायत १-६७-२० पो.ख ०-०७-१० एकुण क्षेत्र १-७४-३० | १५.६२ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक नबाबाई बळीराम घोलप, ताराबाई बंधू दळवी, परशुराम बाबु मोरे, बबन बाबु मोरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ८१/२ | ०२-७५-४० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी ००-६०-०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राबाबत | १२.०० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २५ जुन २०२६

**ॲड.शरद आर.सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ.सो.लि.कोतवालनगर
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली बिनशेती मिळकत ही या खाली दिलेल्या जमीन मालक यांच्या नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नावे असून त्यांचे खुद्द ताबा कब्जा मालकी वहीवाटीतील आहेत. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मौजे रोहा, ता. रोहा, जि. रायगड येथील ........**

| मालकांचे नाव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| फिझा अब्दुलहाद अधिकारी | १८५/३/४/५/ब/२/ प्लॉट नं.६ | ३-१५-०० (३ गुंठे १५पॉ.) | ३१.५० | बिनशेती |

वरील मिळकती संबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लीज, फरोक्त, साठेकरार, अक्तयार, लिन चार्ज, ॲटॅचमेंन्ट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहीवाट वचन चिठ्ठी, दावा, दरखस्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन (१४) सात दिवसात लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. २५/०६/२०२६

**ॲड. पी.जी.दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी विंग, ४ था मजला
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर
डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ, ता. रोहा,
जि. रायगड पिन ४०२१०९
मो. नं. ९२७२७१३९५६

### जाहिर सूचना

प्रति,
श्रीम. गायत्री संदिप पवार,
(पूर्वाश्रमीची कु.लिना अविनाश खोत) ..... अर्जदार
रा.ए-३, गौरीनंदन को.ऑ.हौ. सोसायटी,
विद्यानगर, ता.अलिबाग, जि.रायगड

विरूद्ध

१. श्री. मनोज अनंत साखरकर
२. सौ. स्नेहा मनोज साखरकर
रा. ५०३, नवस्मृती को.ऑ.हौ.सोसायटी लि., . सामनेवाले
कलिना वाकोला रोड, सांताक्रुझ (पू.),
मुंबई - ४०००५५

विषय :- अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील क्र. हक्कनोंद/अपिल नं.४५/२०२५ दि.०९.१२.२०२५ चे आदेशा विरुद्ध फेरतपासणी अर्ज.

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील फेरतपासणी अर्जाची सुनावणी मा.अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक २०.०७.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही, असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले)**
**कोकण विभाग**

### अलिबाग नगरपरिषद
### जाहीर निविदा सूचना

अलिबाग नगरपरिषदेकरीता खालीलप्रमाणे इच्छूक उमेदवारांद्वारे ऑफलाईन पद्धधतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकरीता विविध कामांकरीता साहित्य पुरवठा करणेकरीता निविदा मागविण्यात येत आहेत. | दि. २५/०६/२०२६ ते ०३/०७/२०२६ पर्यंत राहील. वेळ : सायंकाळी ४.०० पर्यंत |

सदर विषयी अधिक माहिती अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभाग येथे उपलब्ध आहे.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

दि. २२/०६/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक सदानंद दामोदर पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|---|
| पेझारी ता. अलिबाग | ५६/२/अ | जिरायत ०-४७-४० पो. ख ०-०३-३० एकुण क्षेत्र ०-५०-७० | ७.९४ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

# रेवदंडा बसस्थानकाला तळ्यांचे स्वरूप

## पहिल्याच पावसात दयनीय अवस्था | प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

पहिल्याच पावसात अलिबाग तालुक्यातील रेवदंडा एस.टी. बसस्थानकाच्या आवाराची दयनीय अवस्था समोर आली आहे. यावेळी रेवदंडा स्थानक परिसरात ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून तळी निर्माण झाली आहेत. त्यामुळे प्रवासी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, संबंधित विभागाच्या दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



रेवदंडा एस.टी. बसस्थानक हे अलिबाग, मुरूड आणि रोहा तालुक्यांना जोडणारे महत्त्वाचे मध्यवर्ती स्थानक आहे. येथून दररोज शेकडो प्रवासी विविध गावांसह मुंबई, पुणे, ठाणे, शिर्डी इत्यादी ठिकाणांसाठी प्रवास करतात. त्यामुळे बसस्थानक परिसरात दिवसभर मोठी वर्दळ असते. मात्र, बसस्थानकाच्या आवारातील रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खोल खड्ड्यांमुळे पावसाळ्यात पाणी साचून मोठ्या तळ्यांचे स्वरूप निर्माण झाले आहे. या खड्ड्यांमधून एस.टी. बसेस ये-जा करताना वाहनांना धक्के बसत असून, प्रवाशांनाही त्रास सहन करावा लागत आहे. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात चालकांची कसरत होत असून, त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

याशिवाय बसस्थानक परिसरात अनधिकृत आणि बेशिस्त वाहन पार्किंगची समस्या गंभीर बनली आहे. आवारात उभ्या राहणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांमुळे एस.टी. बसेसच्या हालचालींना अडथळा निर्माण होत आहे. खड्डे आणि अनधिकृत पार्किंग यांचे दुहेरी संकट बसस्थानकासाठी अपघाताचे निमंत्रण ठरत असल्याची भावना प्रवासी वर्गातून व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी बसस्थानकाच्या आवारातील रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजविण्याची, तसेच अनधिकृत पार्किंगवर नियंत्रण आणण्याची मागणी केली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच समोर आलेल्या या समस्येकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

> **रेवदंडा बसस्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. मात्र, आवारातील खड्डे आणि पाण्याची तळी पाहता प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत.**
>
> **- स्थानिक नागरिक**

# भुयारी मार्ग की तरण तलाव?

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्याच्या विकासाचे गोडवे गाणारे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन पहिल्याच पावसात तोंडघशी पडल्याचे चित्र समोर आले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या रेल्वे स्थानकांची अवस्था एवढी दयनीय झाली आहे की, प्रवाशांना आता रेल्वे स्थानकात प्रवेश करण्यासाठी भुयारी मार्गाऐवजी अक्षरशः ''तरण तलाव'' पार करण्याची वेळ आली आहे.



उरण तालुक्यात विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर मोठ्या गाजावाजात लोकल रेल्वे सेवा सुरू करण्यात आली होती. मात्र, स्थानकांना देण्यात आलेल्या चुकीच्या नावांबाबतच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आलेच, शिवाय आता स्थानकांच्या दर्जाहीन बांधकामाचेही पितळ उघडे पडू लागले आहे. सोमवारपासून सुरू झालेल्या पावसाने उरणसह द्रोणगिरी रेल्वे स्थानकाच्या भुयारी मार्गातील नियोजनाचा फज्जा उडवला आहे. सकाळी ९.४७ वाजताची लोकल पकडण्यासाठी आलेल्या प्रवाशांना भुयारी मार्गात गुडघ्यापेक्षा अधिक पाणी साचल्याचे दिसून येत आहे. गेल्यावर्षी ज्या भुयारी मार्गांमध्ये पाणी साचले होते, त्याच ठिकाणी यंदाही पहिल्याच पावसात पाणी भरल्याने रेल्वे प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी, अनेक प्रवाशांना जीव धोक्यात घालून रेल्वे रुळांवरून चालत स्टेशन गाठावे लागत आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे एखादी दुर्घटना घडली असती तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल प्रवासी उपस्थित करत आहेत. तसेच, हा संपूर्ण परिसर खाडीलगतचा असल्याने पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता आधीपासूनच गृहित धरली गेली होती का? रेल्वेच्या तांत्रिक विभागाने भूगर्भ, भरती-ओहोटी आणि पावसाच्या पाण्याचा निचरा याबाबत नेमका कोणता अभ्यास केला होता? असे गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

# पहिल्याच पावसात निसर्गाचा तडाखा

## चौल-भोवाळेतील रस्ता ठप्प

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

हवामान विभागाने दिलेल्या येलो अलर्टचा पहिला फटका अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे परिसराला बसला आहे. मंगळवारी (दि.२४) सकाळी सुमारे ६.०० वाजण्याच्या सुमारास रस्त्यालगत असलेला भला मोठा आकाशी वृक्ष अचानक कोसळल्याने वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली. या घटनेमुळे सकाळच्या वेळेत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह नागरिकांची मोठी गैरसोय झाली. रस्त्यावर वृक्ष आडवा पडल्याने वाहनांची रांग लागली होती. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून स्थानिक युवकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. भोवाळे येथील अभय फुंडे,



किशोर ठाकूर, जयवंत घरत, आर्यन मिसाळ, अजिंक्य मिसाळ आणि निखिल खारकर यांनी एकत्रितपणे वृक्षाच्या फांद्या तोडून रस्ता मोकळा केला. त्यांच्या तत्परतेमुळे वाहतूक पुन्हा सुरळीत झाली आणि पुढील अनर्थ टळला. युवकांच्या या सामाजिक बांधिलकीचे परिसरातून कौतुक होत असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# मुरूड तालुक्यात दमदार पाऊस

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिक चिंतेत होते. मात्र, सोमवारी झालेल्या पावसामुळे पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना चालना मिळणार असून, पाणीसाठ्यांमध्येही काही प्रमाणात वाढ होण्याची अपेक्षा आहे. तसेच, उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, शेतकरी राजा देखील सुखावला आहे. रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यात मंगळवारी (दि.२३) सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. सकाळी ८.०० वाजेपर्यंत १५० मि.मी.तर दुपारपर्यंत १९९ मि.मी.पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, तालुक्यातील विविध ठिकाणची वाहतूक विस्कळीत झाली होती. प्रचंड प्रमाणात पाऊस पडल्याने शेतीमध्ये सुद्धा



● (छायाचित्रः सुधीर नाझरे)



पाणी साचले होते. आता मुरुड शहरातील पंचक्रोशीतील भागातील पेरणीच्या हंगामास निश्चितपणे सुरुवात होईल, अशी परीस्थीती आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी शेतीची आंतरमशागत, बांधबंधीस्ती, जनावरांचे वैरणाचा भरणा, गोठा बांधणी इत्यादी कामांना प्राधान्य दिले होते. खरीपाच्या पेरणीची तयारी या भागात शेतकऱ्यांनी केली असून, केवळ पेरणीयोग्य पावसाची प्रतिक्षा शेतकरी करत होते. पावसाच्या आगमनाने सर्वत्र समाधान व्यक्त होत असले तरीही अजूनही सुरुवातीला भरपूर प्रमाणात पाऊस होणे आवश्यक आहे. त्यामुळे पेरण्या प्रारंभ जरी होत असल्या तरी या भागात जोरदार पावसाची अपेक्षा शेतकरी करीत आहेत. तर, ज्या ठिकाणी भातशेतीचे राब उशीरा टाकले गेले तेथील राब पाण्यात वाहून जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. तसेच, समुद्राला मोठे उधाण असल्याने जंजिरा किल्ल्यासमोर उंच लाटा उसळत होत्या. या लाटांचे तांडव पाहण्यासाठी खोरा बंदरात पर्यटक व नागरिक हजेरी लावत होते.



● महाड एमआयडीसी मधील कांबळे फाटा ते सुदर्शन कंपनी दरम्यानच्या नवीन रस्त्यावर पहिल्याच पावसात पाणी तुंबल्याने ड्रेनेज सिस्टम आणि कामाच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होत आहे. (छायाचित्रः उदय सावंत)





● पोलादपूर शहरातील प्रभातनगर पूर्व-पश्चिम विभागाला जोडणारा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग पहिल्याच पावसात वीतभर पाण्याखाली गेला आहे. (छायाचित्रः शैलेश पालकर)



● पोटलज खुर्द- सुधागड तालुका (छायाचित्रः भुषण सुतार)

# कळंबोलीतील नालेसफाईचा खर्च पाण्यात

**। कळंबोली । प्रतिनिधी।**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेकडून कळंबोली परिसरात नालेसफाईची कामे हाती घेण्यात आली असून, अनेक ठिकाणी ही कामे पूर्ण झाली आहेत. तर, काही भागांत पाऊस पडायला सुरूवात झाली तरी अद्याप सुरूच आहेत. मात्र, नालेसफाईनंतर नाल्यांमधून काढण्यात आलेला गाळ, माती आणि कचरा रस्त्याच्या कडेला टाकून ठेवण्यात आल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कळंबोलीतील सिडको कार्यालय ते हॉस्पिटल सेक्टर-५ या परिसरात नाल्यातून काढलेला मोठ्या प्रमाणातील गाळ व कचरा रस्त्याच्या बाजूला ढिगाऱ्यांच्या स्वरूपात पडून आहे. नालेसफाई होऊनही हा कचरा अद्याप उचलण्यात आलेला नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, पावसाळ्याला सुरुवात झाल्याने पावसाच्या पाण्यासोबत हा गाळ व कचरा पुन्हा नाल्यांमध्ये वाहून जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे नालेसफाईवर खर्च होणारा वेळ आणि निधी वाया जात असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.



# पहिल्याच पावसात रस्त्यावर नदी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ विकास प्राधिकरण मधील ममदापूर गावाकडे जाणारा रस्ता पहिल्याच पावसात पाण्यात बुडाला आहे. या ठिकाणी असलेल्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या बांधकाम व्यावसायिकांनी तेथे मातीचा भराव करून ठेवल्याने नैसर्गिक पाणी जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. त्यामुळे रहिवाशांना पाहिल्याचा पावसात गुडघाभर पाण्यातून वाट काढावी लागत आहे.

नगररचना विभाग आणि जिल्हा परिषद यांनी नेरळ ग्रामपंचायत, ममदापूर ग्रामपंचायत आणि कोल्हारे ग्रामपंचायत मधील भविष्यातील नियोजन करण्यासाठी २००७ मध्ये नेरळ संकुल विकास प्राधिकरण यांची स्थापना करण्यात आली. मात्र, तरीदेखील ममदापूर ग्रामपंचायतमध्ये बिल्डर लॉबी कोणालाही जुमानत नाही. त्यामुळे मागील वर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला आठ दिवस गावाकडे जाणारा रस्ता बंद होता. यावर्षी सुद्धा पावसाळ्यापूर्वीच एका बिल्डरने त्याच ठिकाणी



नेरळ-ममदापूर मुख्य रस्त्यास लागून मातीची भरणी करून नैसर्गिक नाला बंद करण्याचा प्रताप केला आहे. या विकृत मानसिकतेमुळे ममदापूर भडवळ परिसरातील नागरिकांनी गेल्या वर्षी खूप त्रास सहन केला आहे. त्यामुळे या वर्षी पुन्हा परिस्थिती जैसे थे अशीच असून ग्रामस्थांना गुडघाभर पाण्यातून जावे लागत आहे. सोमवारी (दि.२२) ममदापूर परिसरात केवळ ३० मिनिटे पाऊस झाला आणि त्यानंतर देखील ममदापूर गावाकडे जाणारा रस्ता पाण्याने भरून गेला.

# माथेरानमध्ये चांगला पाऊस



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

यावर्षी तब्बल १५ दिवस उशिरा सुरू झालेल्या पावसाने सर्वत्र आल्हाददायक वातावरण निर्माण केले आहे. माथेरानमध्ये सलग तिसऱ्या दिवशी चांगला पाऊस झाला असून, माथेरान शहरात धुक्याची दुलई दिसून येत आहे. दरम्यान, माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या नेरळमध्ये देखील पावसाने चांगली सुरुवात केल्याचे दिसून येत आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हजेरी लावणारा पाऊस आता १५ दिवस उशिराने सुरू झाला आहे. दि.२२ जून रोजी माथेरानमध्ये पहिल्यांदा पहाटेच्या सुमारास हजेरी लावणारा पाऊस सायंकाळी पुन्हा हजेरी लावून गेला. त्यामुळे माथेरानमध्ये आल्हाददायक वातावरण निर्माण झाले असून, माथेरान शहरात, जंगल भागात आणि लोकवस्ती असलेल्या भागात धुकेमय वातावरण पाहायला मिळाले. पहिल्या पावसात भिजण्याचा आनंद आणि परिसरातील धुकेमय वातावरण यामुळे माथेरानमध्ये पर्यटनाची मज्जा घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी दिसून येत आहे. दरम्यान, नेरळमध्ये देखील पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे नेरळ परिसरातील वातावरण आल्हाददायक बनले असून, शेतकरी शेतीच्या कामाला लागले आहेत.


## ढोपरभर खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

**खांब :** पहिल्याच पावसात रोहा तालुक्यातील खांब-पालदाड मुख्य मार्गाची मोठीच दूरवस्था निर्माण झाली आहे. येथे पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांसह सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. गेली दोन दिवस सतत कोसळत असलेल्या पावसामुळे ठिकठिकाणी ढोपरभर खड्डे पडल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठाच मनस्ताप सहन करावा लागत आहे. या मार्गावर दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू असते.

# चाणजे ग्रामपंचायतीच्या नालेसफाईची पोलखोल

**। उरण । प्रतिनिधी ।**

पहिल्याच पावसात चाणजे ग्रामपंचायतीच्या पावसाळापूर्व तयारी आणि नालेसफाईच्या दाव्यांची पोलखोल झाली आहे. मुसळधार पावसानंतर गावातील अनेक भागांमध्ये नाल्याचे पाणी थेट घरात शिरल्याने त्यांच्या संसाराची मोठी दाणादाण उडाली आहे. घरातील फर्निचर, अन्नधान्य, विद्युत उपकरणे व अन्य साहित्याचे नुकसान झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दरवर्षी नालेसफाईसाठी निधी खर्च झाल्याचे दाखविले जाते. परंतु, प्रत्यक्षात मात्र नाल्यांची योग्य प्रकारे



साफसफाई न झाल्याने पावसाचे पाणी तुंबून ते घरांमध्ये घुसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजावर आणि निधीच्या वापरावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, चाणजेच्या सरपंचांचा महाराष्ट्रातील उत्कृष्ट सरपंच पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. मात्र, गावातील सद्यस्थिती पाहता हा पुरस्कार कोणत्या निकषांवर देण्यात आला, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. ग्रामस्थांच्या मते, गेल्या अनेक वर्षांत विविध विकास योजनांअंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त झाला असला तरी त्याचा अपेक्षित लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचलेला नाही.

# ट्रान्स हार्बर रेल्वे सेवेचा बोजवारा

**। खांदा वसाहत । प्रतिनिधी ।**

पहिल्याच जोरदार पावसाने ट्रान्स हार्बर रेल्वे सेवेची पोलखोल केली असून, बुधवारी (दि.२४) सकाळपासून रेल्वे वाहतूक विस्कळीत झाल्याने पनवेल रेल्वे स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी उसळली होती. सकाळच्या गर्दीच्या वेळेत अनेक लोकल गाड्या उशिराने धावत असल्याने चाकरमान्यांचे हाल झाले. महिला, विद्यार्थी, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिक रेल्वेच्या प्रतीक्षेत तासन्तास फलाटांवर थांबून असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

● (छायाचित्रः राजेश डांगळे)



काही प्रवाशांनी पर्यायी वाहतुकीचा आधार घेतला, तर अनेकांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यास उशीर झाला. पनवेल रेल्वे स्थानक परिसरात सध्या विविध विकासकामे सुरू असून, पावसाळ्यात प्रवाशांच्या सुरक्षिततेसह सुरळीत वाहतुकीसाठी विशेष उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे. दरवर्षी पावसाळ्यात रेल्वे सेवा विस्कळीत होण्याच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

# 'चंद्रावरील पिकनिकला चला'

## खड्डेमय रस्त्यामुळे पर्यटनाची सुवर्णसंधी | नऊ गावांचा अनोखा प्लॅन

**। पाली/बेणसे । धम्मशील सावंत ।**

विकासाच्या व्याख्येपासून दूर राहिलेल्या सुधागड तालुक्यातील नऊ गावांमधील ग्रामस्थांनी आता एक अतिशय अनोखी आणि उपरोधिक शक्कल लढवली आहे. पाच्छापूर फाटा ते पाच्छापूर या तब्बल रस्त्यावरील खड्ड्यांकडे पाहता, सामान्य माणसांना चंद्रावर पोहचणे शक्य नसल्याने, प्रशासनाने इस्त्रोच्या आधीच सामान्य नागरिकांना चंद्रावर सफर करण्याचा अनुभव देण्याची व्यवस्था केली आहे. या अनोख्या ट्रेनिंग सुविधेबद्दल प्रशासनाचे आभार मानण्यासाठी येथील ग्रामस्थांनी थेट ''चंद्रावर पिकनिकला चला'' असे उपरोधिक पोस्टर सोशल मीडियावर व्हायरल केले आहे. या उपहासात्मक सहलीला आतापासूनच तालुक्यातील असंख्य नागरिकांनी मोठा पाठिंबा दर्शवला आहे.

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात याच नऊ गावांतील ग्रामस्थांनी एकत्र येत लोकवर्गणी आणि श्रमदानातून साडेचार किलोमीटरचा रस्ता तात्पुरता दुरुस्त करून प्रशासनाचा ताण कमी केला होता. मात्र, त्यानंतरही प्रशासनाने आपल्या निसर्गरम्य धोरणानुसार या रस्त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. परिणामी, सध्या या रस्त्याची अवस्था हुबेहूब चंद्रावरील विवरांसारखी झाली आहे. याच पार्श्वभूमीवर नऊ गाव संघर्ष समिती, शहरवासी आणि स्थानिक नागरिकांनी एकत्र येत डिजिटल आणि प्रिंट मीडियासह सर्व पर्यटकांना व हितचिंतकांना दि.५ जुलै रोजी पाच्छापूर फाटा येथे या चंद्रावरील पिकनिकसाठी एकत्र येण्याचे जाहीर आवाहन केले आहे.

### 'यातच खरे सुख आहे'

सध्या या रस्त्यावरून दररोज शाळकरी मुले, रुग्ण आणि स्थानिक नोकरदार वर्गाला ॲडव्हेंचर स्पोर्ट्सचा थरारक अनुभव घेत, जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. आधीच मोबाईल नेटवर्क नसणे आणि इतर नागरी सुविधांचा अभाव यांमुळे त्रस्त असलेल्या या नऊ गावांतील ग्रामस्थांना आता ''यातच खरे सुख आहे'' असे वाटू लागले आहे. या अभिनव पिकनिकच्या कल्पनेमुळे तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात प्रशासनाच्या या खास कामगिरीची जोरदार चर्चा रंगली आहे. हि पिकनिक अधिक आनंददायी व्हावी यासाठी शहरवासी व स्थानिक ग्रामस्थ विशेष प्रयत्न करीत आहेत.



## अरेरे, हिंदूंचा स्वाभिमान!

रामाचे नाव घेतले म्हणजे आपोआप चारित्र्य सुधारत नाही. श्रीराम हा आईच्या वचनासाठी एका शब्दाखातर वनवासात गेला. नंतर त्याने चौदा वर्षे चुकूनही राज्याकडे मागे वळून पाहिले नाही. गेलेल्या संपत्तीच्या आठवणी काढल्या नाहीत. भाजपवाले रामाच्या नावाने राज्य करतात. पण त्याचा एकही सद्गुण यांच्यात नाही. उलट आज राम असता तर शेकडो वेळा त्याने यांचा वध केला असता इतकी पापे हे करीत असतात. रामाच्या नावाने यांनी राजकारण सुरू केले. रथयात्रा काढली. त्यातून दंगे झाले. हजारो माणसे मेली. लोकांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली. अयोध्येत बाबरी मशीद पाडणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाला दिलेला शब्द भाजपवल्यांनी व यांच्या मुख्यमंत्र्याने मोडला. पुढे त्याच सर्वोच्च न्यायालयाच्या कृपेने यांचे मंदिर उभे राहिले. पण आता त्याच्या दानपेटीतल्या रकमेवर भाजपच्या परिवारवाल्यांनी हात मारल्याच्या बातम्या आहेत. आधी दोन कोटीपासून सुरू झालेली ही भानगड आता किमान दोनशे कोटी रुपयांच्या घरात जाऊन पोचली आहे. एकीकडे कोरोनाचा कहर चालू असताना भाजप व मोदींनी हट्टाने रामाच्या मंदिराची उभारणी सुरू केली. त्याचे कार्यक्रम केले. नंतर मंदिर पूर्ण झालेले नसतानाच त्याच्या उद्घाटनाचा घाट घातला गेला. त्यातही मोदींनी मिरवून घेतले. यासाठी ट्रस्ट स्थापन झाला. अगदी पंतप्रधानाच्या कार्यालयातला नृपेंद्र मिश्रा यांच्यासारखा अधिकारी तिकडे पाठवण्यात आला. पण रोजच्या दानपेटीमध्ये जमा होणाऱ्या पैशांवर, मंदिराला मिळालेल्या देणग्यांची भानगड होण्याचे टळले नाही. रामावरच्या श्रद्धेतून दुनियाभरातले लोक इथे येतात व देणग्या देतात. मध्यंतरी अयोध्या हा श्रध्दाळू भाविकांचा नवीन भेट देण्याचा स्पॉट झाल्याचे चित्र मिडियातून रंगवण्यात आले. देशाचा पंतप्रधान बाजारी मानसिकतेचा असला की प्रत्येक गोष्ट विकणे इतकेच त्याला जमते. त्यानुसार लोकांच्या श्रध्देचा बाजार मांडला गेला आणि अयोध्या हे पर्यटनस्थळ म्हणून विकणे हे उद्दिष्ट ठेवले गेले. यातून रामाच्या मंदिराचे वैभव वाढले असेल पण हिंदूंना अपेक्षित असलेला आध्यात्मिक आनंद काही तिथे निर्माण झाला नाही.

### चौकशी सुरु, पण एफआयआर नाही

याचे कारण म्हणजे राम, रामाचे मंदिर हे हिंदी गायपट्ट्यातल्या आणि गुजराती भाजपवाल्यांसाठी एक किराणा मालाचे दुकान आहे. त्या रीतीनेच ते चालवत आहेत. आणि त्याच्या गल्ल्यावर बसल्याबसल्या येणाऱ्या पैशांवर हात मारणे चालू होते असे दिसते. या मंदिराच्या दानपेटीत गेल्या पाच वर्षात निव्वळ रोख रक्कम सुमारे अडीच हजार कोटी रुपये जमा झाली असावी असा अंदाज आहे. बाकी, सोन्याचांदीचे दागिने, देवाला वाहिलेल्या इतर वस्तू वगैरे वेगळ्याच. या रकमेचे नीट हिशेब ठेवले जात नसल्याचे ताशेरे ऑडिट करणाऱ्या संस्थेने सहा वर्षांपूर्वीच मारले होते. पण त्याची पर्वा न करता आतले उद्योग तसेच चालू राहिले. रोज जमा होणारी रोख रक्कम मोजण्यासाठी काही व्यवस्था लावण्याची गरज होती. त्यातून पैशांचा अपहार होणार नाही हे पाहिले जायला हवे होते. पण या काम करणाऱ्यांनीच आपली धन करून घेतली असे दिसते. ज्यांना २० किंवा २५ हजार रुपये पगार होते ते फॉर्च्युनर गाडी घेऊन आपल्या नोकरीवर येत असत. तेव्हाच खरा संशय यायला हवा होता. पण वरपासून सर्व जण या व्यवहारात सामील असतील तर संशय येणार कसा असे झाले. या सर्वांनी अयोध्येत मोठ्या प्रमाणात जमिनींचे व जागांचे व्यवहार केले असून त्यात करोडो रुपये मिळवले आहेत. यातला काही पैसा भाजपकडे गेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा सर्व लोकांच्या श्रध्दांचा गैरफायदा आहे. यातली फसवणूक किती रकमेची आहे यापेक्षाही लोकांच्या श्रध्दांची ही फसवणूक आहे हा गंभीर गुन्हा मानायला हवा. एरवी अशा प्रकरणांमध्ये तात्काळ फिर्याद दाखल होऊन आरोपींना अटका वगैरे होतात. पण हे प्रकरण भाजपच्या घरचा मामला असल्याने बुधवारपर्यंत एकही गुन्हा नोंदवण्यात आला नव्हता. गंमत म्हणजे गुन्हा नसतानाही एसआयटी मात्र स्थापन करण्यात आली होती व तिचा अहवालही सादर झाला. पण एकही गुन्हा नाही, एकही अटक नाही. हे प्रकरण समजा काँग्रेसशी संबंधित संस्थेचे असते तर एव्हाना ईडी तिथे पोचली असती, देशभर धाडी पडल्या असत्या, बुलडोझर लावून काहींची घरे पाडली गेली असती. भाजपवाल्यांच्या राज्यात गुन्ह्यांना किती कठोर शासन होते हे दाखवण्याची स्पर्धा लागलेली असते.

### रामाच्या नावाने डल्ला

यूपीमध्ये योगी नावाचे मुख्यमंत्री हे तर काही निर्माण करण्यापेक्षा पाडण्याच्या मानसिकतेचे आहेत. हे केवळ मुख्यमंत्रिपदावर आहेत म्हणूनच त्यांचा उल्लेख आदरार्थी करावा लागतो. मुसलमान आरोपी असला की त्याचे घर पाडणे हे यांना सत्कृत्य वाटते. त्यांचे मूर्ख भक्त चेकाळून त्यांना दाद देतात. योगींनी यूपीतली गुंडगिरी नष्ट केली असे म्हणतात. पण याच योगीच्या राज्यात अयोध्येतल्या शेकडो कोटींच्या पैशांची भानगड होते तेव्हा त्याची कुठेही वाच्यता होऊ नये याची काळजी घेतली जाते. मिडिया गप्प राहतो. योगीला जाब विचारत नाही. योगीही गप्प राहतो. या प्रश्नाचे राजकारण करू नका असे विरोधकांनाच बजावतो. योगी आणि त्याच्या भाजप गँगमधल्या मंडळींनी रामाच्या नावाने जमा झालेला चंदा खाल्ला तरी त्याविषयी सवाल करायचे नाहीत. ही मंडळी सत्तेत राहून गुपचूप ते सर्व मिटवणार. आता एसआयटीचा अहवाल आलेला आहे. त्यातल्या शिफारशींनुसार खालच्या स्तरातल्या दोनपाच कर्मचाऱ्यांना बहुदा अटक वगैरे केली जाईल आणि या प्रकरणी कारवाई झाली म्हणून त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला जाईल. वाईट गोष्ट अशी आहे की, आपल्या श्रध्देचा बाजार चालू आहे, त्याचा धंदा आणि गोरखधंदा झाला आहे हे कळूनही या देशातले लाखो हिंदू गप्प राहणार आहेत. भाजपला याबाबत कोणताही जाब विचारण्याचे टाळणार आहेत. मोदी या प्रकरणी तोंड का उघडत नाहीत असा प्रश्न त्यांना पडणार नाही. निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेस तुमचे मंगळसूत्र काढून घेणार आहे असा अचकट विचकट प्रचार मोदींनी केला होता. आता त्यांच्याच अधिपत्याखाली राममंदिर नावाच्या सर्वात महत्वाकांक्षी प्रकल्पात भ्रष्टाचार झाला आहे. लोकांच्या श्रद्धेचे मंगळसूत्र यांनी विकून खाल्ले आहे. तरीही मोदी हे हिंदुत्वाचे महान, प्रामाणिक व आदर्श नेते म्हणून मिरवत राहणार असतील तर या देशाची अवस्था कठीण आहे. राममंदिरात भ्रष्टाचार करणारे जितके दोषी आहेत तितकेच तो उघड झाल्यानंतरही गप्प राहणारेही आहेत. मंदिराच्या पैशांवर हात मारण्याचे प्रकार सर्वत्र होत असतात. हे करणारे अत्यंत प्रेतिष्ठित असे हिंदू असतात. पण हिंदू समाजाच्या तथाकथित स्वाभिमानाचे प्रतीक म्हणून जे मंदिर उभे करण्यात आले तिथल्या पैशांचे व्यवहारही या प्रतिष्ठित हिंदूंना चोख ठेवता आले नाहीत. तेथे आपल्याच हिंदू बांधवांना गंडवण्यात आले. आधी रामाच्या नावाने गंडवून राजकीय सत्ता हाती घेतली गेली. नंतर रामाच्या नावाने जमा झालेल्या पैशांवरही डल्ला मारण्यात आला. ही आहे हिंदूंच्या तथाकथित स्वाभिमानाची अवस्था.

## विचार

# श्रद्धेचा बाजार आणि संस्थात्मक पारदर्शकता

***प्रभू श्रीराम 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या जीवनात नैतिकतेचे आणि पारदर्शकतेचे सर्वोच्च आदर्श घालून दिले. एका नागरिकाने उपस्थित केलेल्या शंकेवरून त्यांनी स्वतःच्या कौटुंबिक सुखाचा त्याग केला, इतकी त्यांची सार्वजनिक जीवनातील शुचिता कडक होती. अशा रामचंद्रांच्या भव्य मंदिराच्या उभारणीत आणि त्यांच्याच चरणी आलेल्या दानात 'मर्यादे'चे उल्लंघन होत असेल, तर ती शरमेची बाब आहे.***



अयोध्येतील प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर हे केवळ विटा-मातीचे किंवा पाषाणाचे बांधकाम नाही, तर कोट्यवधी हिंदूंच्या शतकानुशतकांच्या आस्थेचे, संघर्षाचे आणि अस्मितेचे प्रतीक आहे. एखादी वास्तू इतक्या मोठ्या प्रमाणावर जनमानसाशी जोडली जाते, तेव्हा तिचे पावित्र्य राखणे ही केवळ धार्मिक जबाबदारी उरत नाही, तर एक सर्वोच्च सामाजिक आणि नैतिक कर्तव्य बनते; मात्र गेल्या काही दिवसांमध्ये अयोध्येतील राम मंदिराला अर्पण झालेल्या देणग्यांमध्ये झालेल्या कथित वित्तीय गैरव्यवहारामुळे, कोट्यवधी रुपयांच्या अफरातफरीच्या आरोपांमुळे आणि त्यावरून सुरू झालेल्या राजकीय चिखलफेकीमुळे संपूर्ण देशाचे लक्ष या विषयाकडे वेधले गेले. या प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन उत्तर प्रदेश सरकारने अखेर 'विशेष तपास पथक' (एसआयटी) नियुक्त केले आहे; पण हा केवळ एका मंदिरापुरता मर्यादित असलेला घोटाळा किंवा राजकीय वाद नाही, तर देशातील धार्मिक संस्थांच्या अर्थकारणावर, त्यांच्या व्यवस्थापकीय पारदर्शकतेवर आणि भक्तांच्या निस्सीम श्रद्धेच्या होत असलेल्या संभाव्य गैरवापरावर प्रकाश टाकणारा एक गंभीर इशारा आहे. राम मंदिराच्या उभारणीसाठी देशाच्या आणि जगाच्या कानाकोपऱ्यातून गरिबातील गरिबाने आपल्या घामाचा पैसा तर श्रीमंतांनी सोन्या-नाण्यांचे ढीग अर्पण केले. हे दान केवळ एका ट्रस्टला दिलेले नव्हते, तर ते प्रभू रामचंद्रांच्या चरणी अर्पण केलेले 'भक्तीचे अर्घ्य' होते. अशा परिस्थितीत मंदिराच्या दानपेटीतून आणि देणग्यांतून कोट्यवधी रुपये गायब झाले आहेत, असा आरोप विरोधकांकडून केला जातो, तेव्हा भक्तांच्या मनाला मोठी वेदना होते.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि इतर विरोधी नेत्यांनी या संदर्भात थेट सात कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराचा आरोप केला आहे. सुरुवातीला याकडे निव्वळ राजकीय चिखलफेक म्हणून पाहिले गेले; परंतु सत्ताधारी पक्षाच्याच काही नेत्यांनी आणि माजी खासदारांनी (उदा. बृजभूषण शरण सिंह) 'जर मी यावर खरे बोललो तर अडचणीत येईन' अशी सूचक विधाने केल्यामुळे संशयाचे धुके अधिकच गडद झाले. कोणत्याही लोकशाहीत आणि पारदर्शक समाजात आरोपांचे खंडन केवळ शब्दांनी करून चालत नाही, तर पुराव्यानिशी करावे लागते. राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने अंतर्गत ऑडिट आणि स्टेट बँकेच्या प्रक्रियेचा हवाला देऊन सगळे काही आलबेल असल्याचे म्हटले असले, तरी जनमानसात निर्माण झालेला संशय दूर करण्यासाठी निष्पक्ष चौकशी आवश्यक होती. वाढता असंतोष आणि प्रकरणाचे गांभीर्य ओळखून उत्तर प्रदेश शासनाने लखनऊचे मंडलायुक्त विजय विश्वास पंत यांच्या नेतृत्वाखाली तीनसदस्यीय 'एसआयटी' स्थापन केली. या पथकात वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि वित्त विभागाचे विशेष सचिव यांचा समावेश आहे. या पथकाला १५ दिवसांमध्ये अंतिम अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रशासकीय दृष्टिकोनातून हे पाऊल स्वागतार्ह मानले पाहिजे. कारण यामुळे किमान कायदेशीर पातळीवर तरी 'हा सूर्य आणि हा जयद्रथ' होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**शिवाजी कराळे**

मंदिरातले 'सीसीटीव्ही फुटेज'ची तपासणी, संशयास्पद कर्मचाऱ्यांची चौकशी आणि वित्तीय नोंदींचे 'फॉरेन्सिक ऑडिट' यामुळे सत्य समोर येईलच; परंतु प्रश्न असा उरतो, की इतक्या कडक सुरक्षेत आणि देशातील सर्वोच्च नेतृत्वाचे थेट लक्ष असलेल्या महत्त्वाच्या संवेदनशील ठिकाणी अशी चोरी किंवा गैरव्यवहार करण्याचे धाडस कोणी केले? अयोध्येसारख्या अतिसुरक्षित आणि 'हाय-प्रोफाइल' मंदिराला दिल्या जाणाऱ्या देणग्या सुरक्षित नसतील, तर देशातील इतर हजारो छोट्या-मोठ्या मंदिरांमधील दानाचे काय होत असेल, हा प्रश्न सामान्यांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. राम मंदिराचा हा वाद म्हणजे हिमनगाचे केवळ एक टोक आहे. भारतामध्ये धार्मिक संस्था आणि तिथले अथांग अर्थकारण नेहमीच वादाच्या भोवऱ्यात राहिले आहे. देशात तिरुपती बालाजी, शिर्डीचे साईबाबा मंदिर, सिद्धीविनायक, वैष्णोदेवी, जगन्नाथ पुरी यांसारखी हजारो मंदिरे, देवस्थाने, मशिदींचे वक्फ बोर्ड किंवा चर्चच्या संस्था आहेत, जिथे दरवर्षी अब्जावधी रुपयांचे दान जमा होते. अनेक देवस्थानांमध्ये आजही रोख रकमेच्या (कॅश) स्वरूपात येणारे दान मोजण्याची प्रक्रिया जुनाट आणि अपारदर्शक आहे. अनेकदा बंद खोलीत होणाऱ्या या मोजणीमध्ये मोठ्या प्रमाणावर गळती होते. मंदिरांच्या किंवा धार्मिक संस्थांच्या ट्रस्टवर अनेकदा राजकीय पुढाऱ्यांची, त्यांच्या नातेवाइकांची किंवा ठराविक हितसंबंध जपणाऱ्यांची वर्णी लागते. यामुळे या संस्था भक्तीचे केंद्र न राहता सत्ता आणि संपत्तीच्या विकेंद्रीकरणाची केंद्रे बनतात.

भारतातील धार्मिक संस्थांकडे लाखो एकर जमीन उपलब्ध आहे. या जमिनी कवडीमोल दराने भाड्याने देणे, बेकायदेशीरपणे विकणे किंवा त्यावर अतिक्रमण होऊ देणे असे अनेक प्रकार देशभरात सातत्याने उघडकीस येत असतात. जेव्हा जेव्हा धार्मिक संस्थांमधील संपत्ती अनियंत्रित झाली आहे, तेव्हा तिथे भ्रष्टाचार आणि अनैतिकतेने मूळ धरले आहे. म्हणूनच ब्रिटिशांच्या काळापासून स्वातंत्र्योत्तर भारतापर्यंत धर्मादाय आयुक्त आणि 'हिंदू रिलिजियस अँड चॅरिटेबल एंडोमेंट्स'सारखे कायदे करावे लागले; परंतु कायद्यापेक्षाही माणसाची प्रवृत्ती आणि संस्थात्मक स्वायत्ततेच्या नावाखाली होणारी मनमानी अधिक घातक ठरत आहे. धार्मिक गैरव्यवहारांचा दुसरा काळा पैलू म्हणजे त्यावर होणारे राजकारण. कोणत्याही मंदिरात किंवा धार्मिक स्थळात घोटाळा झाला की विरोधी पक्ष त्याचा वापर सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्यासाठी करतात, तर सत्ताधारी पक्ष त्याला 'धर्म आणि संस्कृतीवरचा हल्ला' असे भावनिक लेबल लावून मूळ मुद्द्याला बगल देण्याचा प्रयत्न करतात. राम मंदिराच्या बाबतीतही नेमके हेच घडताना दिसत आहे. विरोधकांना यात सत्ताधारी पक्षाला 'भ्रष्टाचारी' ठरवण्याची सुवर्णसंधी दिसते आहे, तर दुसरीकडे धार्मिक भावना दुखावल्या जातील या भीतीने अनेकजण या विषयावर उघडपणे बोलण्यास कचरत आहेत; पण एक गोष्ट स्पष्ट समजून घेतली पाहिजे, ती म्हणजे भ्रष्टाचाराला कोणताही धर्म नसतो आणि चोराला कोणतीही जात नसते.

प्रभू रामाच्या नावावर जमा झालेल्या पैशात गैरव्यवहार करणारा केवळ कायद्याचा गुन्हेगार नाही, तर देशातील करोडो हिंदूंच्या आस्थेचा द्रोही आहे. त्याला पाठीशी घालणे किंवा राजकीय फायद्यासाठी या विषयाचे भांडवल करणे तितकेच निंदनीय आहे. 'एसआयटी' तपास करेल आणि दोषींना शिक्षा होईलही; पण या निमित्ताने देशातील प्रत्येक धार्मिक संस्थेने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. भक्तांची श्रद्धा ही अंधश्रद्धा किंवा कोणाच्या तरी लुटीचे साधन बनू नये, यासाठी मंदिरांचे व्यवस्थापन काचेसारखे पारदर्शक असायला हवे. आपण धर्माला या व्यावसायिक आणि राजकीय दलदलीतून बाहेर काढत नाही, तोपर्यंत देवाच्या नावावर चालणारा हा 'श्रद्धेचा बाजार' थांबणार नाही. राम मंदिरातील हा कथित गैरव्यवहार म्हणजे भारतीय धार्मिक संस्थांचे शुद्धीकरण करण्याची एक नामी संधी आहे, असे मानून शासनाने आणि समाजाने याकडे पाहिले पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने देशात 'रामराज्य' अवतरेल. आज तंत्रज्ञान इतके विकसित झाले आहे, की प्रत्येक रुपयाचा डिजिटल मागोवा ठेवणे शक्य आहे. रोख देणगी कमी करून डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे, नोटा मोजण्याच्या प्रक्रियेचे संपूर्ण 'सीसीटीव्ही' चित्रीकरण, स्वतंत्र लेखापरीक्षण, नियमित सार्वजनिक अहवाल आणि बाह्य तज्ज्ञांकडून ऑडिट अशा उपाययोजना सहज राबवता येऊ शकतात. प्रश्न साधनांचा नाही, इच्छाशक्तीचा आहे.

## चर्चा आजची

# आधी पादचारी मग वाहन



देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक निर्णय दिला आहे, जो केवळ कायदेशीर निर्णयच नाही तर विकासाबाबतच्या आपल्या विचारसरणीवरही गहन प्रश्न उपस्थित करतो. पदपथावर सुरक्षितपणे चालणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे आणि मोटार वाहनांपेक्षा रस्त्यावर पादचाऱ्यांचे हक्क अधिक महत्त्वाचे आहेत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. चाक अस्तित्वात येण्यापूर्वी माणूस चालायला शिकला होता, असे न्यायालयाने म्हटले आहे. हे केवळ ऐतिहासिक सत्यच नाही तर आपल्या शहरी आणि ग्रामीण विकास धोरणांवरही सखोल भाष्य आहे. रस्ता अपघातात एका वडिलांनी आपला पाच वर्षांचा मुलगा गमावलेल्या दुःखद अपघाताच्या सुनावणीदरम्यान हा निर्णय देण्यात आला. न्यायालयाने हे प्रकरण केवळ नुकसानभरपाईपुरते मर्यादित न ठेवता, न्यायालयाने पादचाऱ्यांच्या अधिकाराला घटनेच्या कलम १९ आणि २१ शी जोडून त्याला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला. मोटार वाहन कायद्यातील त्रुटींकडेही न्यायालयाने लक्ष वेधले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय महत्त्वाचा आणि दूरगामी का आहे, हे समजून घेण्यासाठी काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. किंबहुना, गेल्या काही दशकांत देशाचा विकास हा जवळपास संपूर्णपणे वाहनांवर केंद्रित झाला आहे. शहरांमध्ये उड्डाणपूल बांधले गेले, रुंद रस्ते बांधले गेले, द्रुतगती मार्ग बांधले गेले, पण पादचाऱ्यांसाठी सुरक्षित पदपथांची गरज जवळपास दुर्लक्षितच झाली. गंमत म्हणजे आजही देशातील मोठी लोकसंख्या पायी चालत आपल्या दैनंदिन गरजा भागवते. गरीब, मजूर, वृद्ध, महिला, मुले, अपंग आणि लहान शहरातील लोक सर्वाधिक पायी प्रवास करतात, परंतु असे दिसते की रस्ते केवळ वाहनांसाठीच राखून ठेवले आहेत. सुरुवातीला हा एक प्रकारचा 'अभिजात प्रभाव' होता, असे न्यायालयाने म्हणणे अगदी बरोबर आहे. वाहने केवळ श्रीमंतांकडे असतानाही पादचाऱ्यांना महत्त्व आले नाही आणि वाहने स्वस्त झाल्याने संपूर्ण रस्ता वाहनांनी व्यापला आहे. आज परिस्थिती अशी आहे की अनेक शहरांमध्ये फूटपाथ नाहीत आणि जिथे आहेत तिथे ते दुकाने, हातगाड्या, पार्किंग आणि अतिक्रमणांनी गिळंकृत केले आहेत. या निर्णयात अनेक महत्त्वाच्या बाबींचा समावेश आहे. या निर्णयामुळे नागरिकांना चालण्याचा अधिकार प्रस्थापित झाला आहे. आता फूटपाथ हा सरकारी दयेचा प्रश्न नसून नागरी हक्कांचा प्रश्न आहे. यासोबतच न्यायालयाने महापालिका, विकास प्राधिकरण, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींची जबाबदारी निश्चित केली आहे. आता संसाधने नाहीत किंवा ती त्यांची प्राथमिकता नाही, असे सांगून ते सुटू शकत नाहीत. रस्ता असेल तर फूटपाथही असावेत. फूटपाथ गहाळ, तुटलेले किंवा अतिक्रमण झाल्यास न्यायालयात जाण्याचा आणि नुकसान भरपाईची मागणी करण्याचा कायदेशीर अधिकार या निर्णयामुळे नागरिकांना मिळाला आहे. या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यास त्याचे दूरगामी फायदे होतील. रस्ते अपघातात मोठी घट होईल. हालचाल सुलभ होईल. प्रदूषण कमी करणे आणि चालणे या संस्कृतीला चालना दिली जाईल. मात्र, सरकारे हा निर्णय किती गांभीर्याने घेतील, असे काही प्रश्न आहेत. आज देशातील बहुतांश छोट्या शहरांमध्ये आणि शहरांमध्ये फूटपाथ नावाची व्यवस्था नाही. जेथे फूटपाथ अस्तित्वात आहेत, ते दुकानांसमोरील उंच प्लॅटफॉर्म, पार्किंग, स्टोरेज एरिया आणि तात्पुरत्या छावणीत रूपांतरित झाले आहेत. महापालिका यंत्रणा आता फूटपाथवरील अतिक्रमणे हटवणार का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे. नवीन रस्ते प्रकल्पात पादचाऱ्यांना प्राधान्य मिळणार का? रस्ता सुरक्षा बजेटमध्ये पदपथांचाही समावेश होणार का? हे असे प्रश्न आहेत जे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही कायम आहेत आणि सर्वसामान्यांना त्यांची सकारात्मक उत्तरे मिळायला हवीत. किंबहुना, आपला संपूर्ण वाहतूक कायदा केंद्रस्थानी असलेल्या वाहनांना धरून तयार करण्यात आला आहे, ज्यामध्ये माणसे दुय्यम आहेत. आता ही विचारसरणी बदलण्याची वेळ आली आहे. विविध न्यायालयांनी वेळोवेळी जनहिताचे निर्णय घेतले आहेत, मात्र त्यांची अंमलबजावणी कितपत झाली हे पाहावे लागेल. पदपथांवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता प्रत्येक शहर व गावातील पदपथांचे सर्वेक्षण करण्यात यावे. अतिक्रमण काढण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. नवीन रस्ते प्रकल्पांमध्ये फूटपाथ अनिवार्य करावेत. शाळा, रुग्णालये आणि बाजारपेठेभोवती पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले पाहिजे. ग्रामीण भागातही सुरक्षित चालण्याचे मार्ग आखले पाहिजेत. हे सर्व आवश्यक आहे, कारण सुसंस्कृत समाजाची ओळख त्याच्या रुंद रस्ते, उड्डाणपूल आणि द्रुतगती मार्गांवर नाही तर सर्वात दुर्बल आणि असुरक्षित व्यक्ती किती सुरक्षिततेने आणि सन्मानाने तेथे फिरू शकते यावर असते. पायी चालणारा नागरिक जेव्हा सुरक्षित असेल, तेव्हाच आपण आपल्या विकासाला खऱ्या अर्थाने मानवी विकास म्हणू शकू. सुप्रीम कोर्टाने आपली जबाबदारी पार पाडत स्पष्ट घटनात्मक निर्देश दिले आहेत. आता चेंडू कार्यकारिणीच्या कोर्टात आहे. सरकारे हा ऐतिहासिक निर्णय केवळ न्यायालयाच्या पानांपुरता मर्यादित राहू देतात की प्रत्यक्षात आणतात हे पाहायचे आहे.

**सुयोग आंग्रे**

## लोकसंसद

### बहुआयामी व्यक्तिमत्त्व

संत तुकारामांच्या भक्तीने पावन झालेल्या एका छोट्याशा देहेन या गावात तसेच शेतकरी कुटुंबात जन्मलेले आमचे वडील कै.रा.जा. राऊत यांची भक्ती या जन्मभूमीतच डोळस झाली आणि त्यातूनच त्यांची घोडदौड एक नवा इतिहास निर्माण करण्याकडे झाली. त्यांचा व्यासंग, एखाद्या गोष्टीवर समग्र विचार करण्याची शक्ती, अभ्यासू वृत्ती यामुळे त्यांनी यशाची शिखरे सर केली. गावामध्ये तुकारामबीजेला भजन कीर्तन करून त्यांनी स्वतः संताची शिकवण समाजात रूजवली. गावामध्ये निरक्षर महिलांना शास्त्रीय भजन शिकवून भजनी मंडळ तयार केले. नॅशनल डिफेन्स ॲकेडमीत प्रशिक्षण घेऊन क्रीडा क्षेत्रात अनेक उच्चांक प्रस्थापित केले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर निरूपण केली. ते स्वतःला शिवाजीचा मावळा म्हणवत. आद्य क्रांतिवीर, वासुदेव बळवंत फडके यांच्या जीवन चरित्रावर 'कर्नाळ्याचा वाघ' हे पुस्तक लिहून समाजातील सर्व स्तरातून त्यांची प्रशंसा मिळविली. तसेच त्यांच्या जीवन कार्यावर रायगड जिल्ह्यातील शाळा, मंडळे आणि महाविद्यालयामध्ये १०१ व्याख्याने देऊन संकल्पपूर्ती केल्याबद्दल तसेच १ मे १९८६ रोजी क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जीवन चरित्राचे कथन टीव्हीवर अत्यंत ओजस्वी भाषेत केल्याबद्दल त्यांच्या या अतुलनीय व समाज प्रबोधन कार्यासाठी त्यांना सन २००९ चा रायगड जिल्ह्याचा सर्वोच्च मानाचा 'रायगड भूषण पुरस्कार' या सन्मानाने गौरविण्यात आले. 'असे जगावे छाताडावर आव्हानांचे लावून अत्तर' असे ते नेहमी म्हणत. कारण रुळलेल्या वाटांवर चालणे अवघड नसते आणि म्हणूनच स्वतः ची वाट त्यांनी आपल्या धडपड, कष्ट व जिद्द यांनी निर्माण केली. एकेक नवीन शब्द वाचनातून शिकणे, त्याचा अर्थ समजावून घेणे, त्या शब्दांचा भाषाभाव, लेखनात उपयोग करणे असे प्रचंड वेड त्यांना होते. म्हणूनच या शब्दवेड्या पप्पांसाठी आम्हा मुलींकडून व सर्व परिवाराकडून शब्दरूपी आदरांजली. रामचंद्र जाखू राऊत यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटूंबात शोककळा पसरली आहे. अभ्यासू वृत्ती असणारे भजनप्रेमी, उत्तम लेखक, व्याख्याने हरपल्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कै.रा.जा. राऊत यांचे उत्तरकार्य ३ जुलै २०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी पोयनाड येथे होणार आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**– ज्योत्स्ना निलेश जुईकर**

## दिनविशेष

# लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराज

महाराष्ट्राच्या मातीतील एक द्रष्टा राजा म्हणजे महाराष्ट्राच्या मातीतील रत्न, राजर्षी छत्रपती शाहू महाराज! ज्यांनी फक्त गादीची माळ गळ्यात घातली नाही, तर जनतेच्या दुःख-दैन्यांची जबाबदारीही पेलली. शोषितांच्या आयुष्यात प्रकाश फेकणारा, शिक्षणाच्या द्वारात सर्वांसाठी समान प्रवेश देणारा, आणि माणुसकीच्या झेंड्याला अभिमानाने फडकवणारा हा एक राजा लोकहितवादी राजा! राजर्षी शाहू महाराजांचा २६ जून हा जन्म दिवस मसामाजिक न्याय दिवस म्हणून पाळला जातो. त्यादिवशी कोल्हापूरमध्ये आणि अन्यत्र काही ठिकाणी बरेच सार्वजनिक कार्यक्रम होतात. राजर्षि शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा हा केवळ इतिहास नाही तर तो भविष्याचा वेध घेणारा विचार आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या कालखंडाकडे पाहताना त्यांनी केलेल्या कार्याचे आजही महत्त्व लक्षात येते. देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक,धार्मिक, शैक्षणिक, आदी क्षेत्राला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. १९०२ चा आरक्षणाचा निर्णय, १९०७ चा सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची उभारणी, कुस्तीकलेच्या संवर्धनासाठी व्यापक प्रयत्न, भारतातील पहिले कुस्तीसाठीचे खासबाग मैदान, शेतीच्या पाण्याच्या सोयीसाठी धरणाची उभारणी, शेतमालावर प्रक्रिया करण्यासाठी सूतगिरणीची उभारणी, नवीन पीकरचना, चहा-कॉफीच्या मळ्यांचा प्रयोग, धार्मिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीविरुद्धचा संघर्ष, नव्या धर्मपीठाची स्थापना, व्यापार-उद्योगासाठी बाजारपेठांची उभारणी, असे असंख्य निर्णय सांगता येतील. जे राजर्षी शाहू महाराज यांनी अखंड भारताच्या इतिहासात प्रथमच केले. असे धोरण आणि निर्णयघेणारे राजे खूपच दुर्मीळ होते. त्यात राजर्षी शाहूमहाराज यांचे सर्वोच्च स्थान होते. राजर्षी शाहू महाराज यांचा दृष्टिकोन हा जागतिक होता. तो प्रगल्भ होता, पुरोगामी होता. समाजातील समस्यांचे आकलन करून त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्याचा विचार त्यात होता. एखाद्या छोट्या प्रसंगातून समाजाची रित, परंपरा, त्यातील अंधश्रद्धा, अडचणी ते जाणून घेत आणि त्यावर केलेली उपाययोजना आज शंभर वर्षांनंतरही लागू पडते, असे विचारमंथन करणारे राजर्षी शाहू महाराज घडले कसे? हे संस्कार त्यांच्यावर कोणत्या प्रकारच्या शिक्षणातून झाले? याचे विश्लेषण केले तर माणूस राज्यकर्ता म्हणून तयार होताना तो कसा असावा, याचे विवेचन समोर येऊ शकते. आजचे राज्यकर्ते असा विचार करीत नाहीत, म्हणून समाजाच्या प्रश्नांवर कायमस्वरुपी उपाययोजना होत नाहीत. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणार्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणार या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२५ जून
१) श्रीम. विद्या दत्तात्रेय शिंदे
चेंढरे-अलिबाग, २५-६-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**श्री. विजय दत्तात्रेय वार्डे, वाढदिवस अलिबाग**

# श्रीवर्धन परिसरात गुटखा, दुग्धजन्य पदार्थांची तपासणी आवश्यक

**• प्रशासनाचे दुर्लक्ष; नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कारवाईची मागणी**

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धन तालुक्यामध्ये अवैध विक्री सुरू असलेल्या गुटख्याबाबत तालुक्यातील पत्रकारांनी जोरदार आवाज उठवून बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर गुटखा विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली नव्हती. परंतु, रायगड पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार श्रीवर्धन पोलिसांनी कारवाई करून गुन्हे दाखल केले होते. मात्र, श्रीवर्धन पोलिसांकडून कारवाई किरकोळ विक्रेत्यांवरच केली जाते. शहरात सर्व किरकोळ विक्रेत्यांना गुटखा पुरविणाऱ्या माफियाला नेहमीच अभय मिळत आहे.

श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या बाहेरुन गुटखा येत नसून याचा मुळ आका श्रीवर्धन शहरातच आहे. कर्तव्यदक्ष सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये अवैध गुटखा, त्याचप्रमाणे भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर सतत कारवाया सुरू ठेवल्या आहेत.



श्रीवर्धन तालुक्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची अवैध विक्री सर्रासपणे सुरू आहे. रायगडमधील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना कायमस्वरूपी अभय दिल्याचे दिसून येते. तसेच श्रीवर्धन तालुक्यामध्ये विविध कंपन्यांचे दही, दूध, लस्सी, ताक त्याचप्रमाणे पनीर विक्रीसाठी बाजारात येत असते. मात्र मागील अनेक वर्षांपासून अशा दुग्धजन्य पदार्थांची कोणत्याही प्रकारची तपासणी अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे श्रीवर्धन तालुक्यात अनेक मिठाईची दुकाने देखील आहेत. या मिठाईच्या दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवलेली मिठाई यावर कोणत्याही प्रकारचे दरपत्रक व मिठाई बनवलेल्याची तारीख लावलेली नसते. फक्त अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी श्रीवर्धनला येतात, सगळ्यांकडून मलिदा घेऊन निघून जातात. त्या एका दिवसापूरते दरपत्रक व मिठाईची तारीख लावलेली असते.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी रायगड जिल्ह्यात विशेष लक्ष द्यावे. जे नागरिक या दुग्धजन्य पदार्थांचा व दुधाचा उपयोग आपल्या रोजच्या जीवनामध्ये करतात त्यांच्या आरोग्याशी कोणी खेळत असेल तर त्याच्यावर योग्य ती कारवाई व्हावी, अशी मागणी सामान्य नागरिकांमधून केली जात आहे.

### फॉरेन्सिक तपासणी होणे गरजेचे

श्रीवर्धन तालुक्यात विक्रीसाठी येत असलेले दूध हे परजिल्ह्यातून येत असते. यामध्ये विशेष करून सातारा व पुणे या जिल्ह्यातील दूध व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश आहे. तरी अन्न व औषध प्रशासनाने या दूध उत्पादक डेऱ्या व त्यांचे दुग्धजन्य पदार्थ याची देखील काटकोरपणे तपासणी करावी. तसेच श्रीवर्धन तालुक्यात विक्रीसाठी ठेवण्यात येणारी चिप्स, कुरकुरे, हल्दीरामचे विविध पदार्थ यांची फ़ॉरेन्सिक तपासणी होणे गरजेचे आहे.



## दिव्यांग मुलांसोबत वाढदिवस साजरा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत प्रासोल केमिकल लिमिटेडचे चेअरमन निषिद शहा यांचा वाढदिवस डॉ. कुंदा दोंदे-सुभाष दोंदे चॅरिटेबल ट्रस्ट खोपोलीमधील गतिमंद व दिव्यांग मुलांसमवेत साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त मुलांना स्टेशनरी साहित्य, मिठाई व भोजन देण्यात आले. तसेच त्यांच्या संगोपनासाठीही कंपनीच्या वतीने सहाय्य करण्यात आले. या उपक्रमामुळे प्रशशिक्षण -ट्रस्टमधील मुलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विशेष मुलांसोबत वाढदिवस साजरा करत प्रासोल केमिकल लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव अधोरेखित केली. मुलांशी आत्मीयतेने संवाद साधत त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण वाटून घेण्यात आले.

## जांभिवली शाळेला एलईडी स्मार्ट टीव्ही भेट

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत जांभिवलीचे माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते अविनाश कदम यांनी आपला मुलगा आयुष कदम यांच्या वाढदिवसानिमित्त जांभिवली येथील जिल्हा परिषद शाळेला एलईडी स्मार्ट टीव्ही भेट दिली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचा अधिक प्रभावी लाभ मिळणार असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेतही भर पडणार आहे.



या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अविनाश कदम यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

अविनाश कदम यांनी केवळ जांभिवली शाळेलाच नव्हे तर खालापूर तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांना विविध शैक्षणिक साहित्य भेट देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या माध्यमातून तुरमाळा, दुरसेत, खालचे उंबरे, झाडाणी, गारमाळ गोहे, आत्तकरगाव, गोठीवली, परखंदे आणि गारमाळ येथील जिल्हा परिषद शाळांना प्रिंटर भेट देण्यात आले आहेत. तसेच जांभिवली, रानसई आणि वावोशी फाटा येथील शाळांना एलईडी टीव्ही प्रदान करण्यात आले आहेत. याशिवाय जांभिवली वाडी येथील शाळेसाठी पत्र्याचे शेड उभारणे, टेबल उपलब्ध करून देणे तसेच दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे असे विविध उपक्रमही त्यांनी राबविले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

## वन महोत्सवाचे आयोजन

**सुतारवाडी :** श्रीमत जगद्गुरु शंकराचार्य महा सस्थानम श्री संस्थान गोकर्णी, परमपूज्य श्री राघवेश्वर भारती महास्वामीजी श्री रामचंद्र मठ होस नगर मुंबई वलय आणि डोंबिवली वलय वन महोत्सव अमृतारा गोशाळा धगडवाडी (कोलाड) येथे दि.५ जुलै रोजी आयोजित केला आहे. या वन महोत्सवास प्रमुख अतिथी म्हणून सदस्य महाराष्ट्र गोसेवा आयोग, प्रांत संयोजक गोसेवा गतिविधि, देवगिरी प्रांतचे मनीष नासाजी वर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. विशेष अतिथी म्हणून आदिजीव युवा चारीटेबल ट्रस्ट मुंबईचे राजू भाई शाह, त्याचप्रमाणे महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य तथा गोशाळा महासंघ महाराष्ट्राचे महासचिव व्ही. एन. हेडगे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. गोशाळेचे पदाधिकारी वन महोत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

## शिक्षणमंत्र्यांनी साधला आदिवासी विद्यार्थ्यांसोबत संवाद

**• शैक्षणिक प्रगतीचा घेतला आढावा**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी नाशिक जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागातील हिवाळी पाडा ता. त्र्यंबकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांशी थेट व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. निसर्गरम्य वातावरणात वसलेली ही शाळा केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रयोगशाळाच ठरत आहे. विशेष म्हणजे ही शाळा सकाळी ९ ते रात्री ९ अशा तब्बल १२ तास विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असून वर्षभर सातत्याने विविध शैक्षणिक आणि कौशल्याधारित उपक्रम राबविले जातात, या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

शाळेत शेती, परसबाग, पर्यावरण संवर्धन, श्रमसंस्कार आणि प्रयोगात्मक शिक्षण यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे शिक्षण अधिक आनंददायी, उपयुक्त आणि जीवनाभिमुख बनले आहे. यावेळी शाळेतील शिक्षक केशव गावित यांच्या उपस्थितीत मंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अध्ययनाची माहिती घेतली; तसेच विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेचा आणि शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. तसेच नियमित अभ्यास, वाचनाची सवय आणि ज्ञानवृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न करण्यासंदर्भात शिक्षणमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाळेतील स्वच्छता, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेबाबतही त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे व्यवस्थित कापलेले केस, स्वच्छ गणवेशे; तसेच स्वच्छ आणि सुंदर शालेय परिसर पाहून त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. स्वच्छता आणि शिस्त या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या मूलभूत बाबी असून प्रत्येक विद्यार्थ्याने त्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मंत्री भुसे म्हणाले की, दुर्गम भागातील हिवाळी पाडा शाळेने शिक्षण, स्वच्छता आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून राज्यसमोर आदर्श निर्माण केला आहे. स्वच्छ शाळा शिस्तबद्ध विद्यार्थी, गुणवत्तापूर्ण शिक्षण हीच उज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षक, पालक, प्रशासनाने संयुक्तपणे कार्य करणे आवश्यक आहे.

## जिल्हाध्यक्षपदी सुनीता आखाडे

**खोपोली :** हर हर चांगभले धनगर समाज संस्थेच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी माजी नगरसेविका सुनीता संतोष आखाडे यांची नुकतीच निवड करण्यात आली. त्यांना निवडीचे पत्र धनगर समाजाचे जिल्हाध्यक्ष अनंता हिरवे यांनी खालापूर येथील आयोजित गुणगौरव कार्यक्रमात दिले. सुनीता संतोष आखाडे या माथेरान नगरपालिकेच्या माजी नगरसेविका असून त्यांनी समाजासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. त्यांची निवड होताच सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## ‘वेगावर नियंत्रण ठेऊन वाहन चालवा’

**माणगाव :** पाऊस सुरु झाला आहे, वाहन चालकांनी वेगावर नियंत्रण ठेऊन वाहन चालवून आपला प्रवास सुखकर, सुरक्षित व आनंदायी करा, असे आवाहन माणगाव नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांनी वाहनचालकांना केले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांनी म्हटले आहे की, सध्या पावसाळा सुरु झाला आहे. सुरुवातीचा पाऊस विशेष करून वाहनचालकांसाठी धोकादायक असतो. कारण उन्हाळ्याच्या दिवसात रस्त्यांवर अनेक ठिकाणी वाहनांचे ऑइल पडलेले असते. तसेच भरावासाठी डंपरमधून जाणारी माती रस्त्यावर पडलेली असते. त्यामुळे सुरुवातीच्या पावसात ही माती व ऑइल संपूर्णपणे धुवून जाईपर्यंत वाहन चालकांना याचा धोका असतो. दुचाकी गाडी तसेच चारचाकी वाहनेही अनेकदा या रस्त्यांवरून घसरून लहान मोठे अपघात होत असतात. या गोष्टीकडे वाहन चालकांनी विशेष लक्ष देऊन आपला प्रवास कसा सुखकर होईल याची काळजी घेणे आवश्यक आहे.

## मीना ठाकूर यांचे निधन

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर (मुळपाडा) येथील मीना वसंत ठाकूर (६४) यांचे अल्पशा आजाराने रविवारी (दि.२१) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार दि.३० जून रोजी श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होणार आहे, तर उत्तरकार्य विधी गुरुवार दि.२ जुलै रोजी चिरनेर मुळपाडा येथील राहत्या घरी होणार आहेत.



## हिले परिवाराचे सामाजिक दातृत्व

**• स्मृती प्रित्यर्थ ग्रामीण विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट**



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहरेवाडी येथे विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. हा संपूर्ण उपक्रम फुलवडे येथील दिवंगत सखाराम रावजी हिले यांच्या स्मृती प्रित्यर्थ राबवण्यात आला. यामुळे ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात उत्साहाने टिकून राहण्यासाठी मोठा आधार मिळाला आहे.

दिवंगत सखाराम हिले यांच्या पवित्र स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव किशोर हिले आणि सुशिला सखाराम हिले यांनी या सामाजिक उपक्रमाचे नेटके आयोजन केले होते. हिले परिवाराने आपल्या दातृत्वाची कौटुंबिक परंपरा जपत, मोहरेवाडी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला अभ्यासासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याचे एक परिपूर्ण किट भेट दिले. या शैक्षणिक किटमध्ये प्रति विद्यार्थी ४ वह्या, पेन, पेन्सिल, पट्टी, रबर, शार्पनर, रंगीत खडू बॉक्स आणि एक चित्रकला वही अशा दैनंदिन अभ्यासासाठी अत्यंत उपयोगी असणाऱ्या वस्तूंचा समावेश होता.

हिले परिवाराने ग्रामीण भागातील मुलांची नेमकी गरज ओळखून ऐन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला केलेल्या या मदतीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

**मुरुड-रेवदंडा मार्गावरील एसटी सेवा सुरु | नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण**

# डोंगरी-मुंबईचा प्रवास होणार अधिक सुलभ

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील नागरिक, नोकरदार, व्यापारी, विद्यार्थी तसेच मुंबईशी दैनंदिन संबंध असलेल्या प्रवाशांसाठी अत्यंत आनंदाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुरुड आगाराने मंगळवारपासून मुरुड-रेवदंडामार्गे मुंबई (डोंगरी-चिचबंदर पूल) थेट बस सेवा सुरू केली असून या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मुरुड, रेवदंडा आणि परिसरातील नागरिकांकडून मुंबईसाठी थेट आणि नियमित बस सेवेची मागणी



केली जात होती. अखेर या मागणीला प्रतिसाद देत एसटी महामंडळाने ही सेवा सुरू केली आहे. त्यामुळे प्रवाशांना आता अनेक ठिकाणी बस बदलण्याची किंवा खासगी वाहनांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होणार आहे.

मुरुड आगारातून ही बस दररोज पहाटे ४.४५ वाजता मुंबईकडे रवाना होणार असून मुंबईतील डोंगरी (चिचबंदर पूल) येथून परतीच्या प्रवासासाठी सायंकाळी ४.३० वाजता मुरुडकडे सुटणार आहे. या वेळापत्रकामुळे मुंबईत नोकरी, व्यवसाय, शिक्षण, वैद्यकीय उपचार तसेच विविध शासकीय आणि खासगी कामांसाठी जाणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

### आर्थिक, सामाजिक विकासाला चालना

मुंबईसारख्या महानगराशी थेट जोडली गेलेली ही बस सेवा केवळ प्रवासाची सोय नसून मुरुड तालुक्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासालाही चालना देणारी ठरणार आहे. व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तर नोकरदारांना वेळेत प्रवास करण्यासाठी ही सेवा महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

विशेष म्हणजे गणेशोत्सव, दिवाळी, उन्हाळी सुट्ट्या आणि इतर सणासुदीच्या काळात गावाकडे येणाऱ्या चाकरमान्यांसाठी ही सेवा वरदान ठरणार आहे. याशिवाय मुरुड जंजिरा, काशीद, नागाव, रेवदंडा या पर्यटन स्थळांकडे येणाऱ्या पर्यटकांनाही या बस सेवेचा मोठा लाभ मिळणार असल्याचे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

या नव्या बस सेवेच्या प्रारंभामुळे मुरुड, रेवदंडा आणि परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> **“प्रवाशांच्या मागणीचा विचार करून ही सेवा सुरू करण्यात आली आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या सेवेचा लाभ घ्यावा आणि एसटी महामंडळाला सहकार्य करावे.”**
> **– राहुल शिंदे, मुरुड आगार प्रमुख**

## निवडक



### स्वप्न सत्यात उतरवा: समीर मोरे

**पोलादपूरे :** जीवनात नेहमी मोठी स्वप्न पहा आणि ती सत्यात उतरवा, असे मार्गदर्शन मठाचे व्यवस्थापक समीर मोरे यांनी विद्यार्थ्यांना केले. श्री स्वामी समर्थ उपासक मंडळ दादर या कशेडी बंगला येथील श्री स्वामी समर्थ मठात अवसारी शेठ चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अवसारी शेठ चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईने ग्रामीण गोरगरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य देत मदतीचा हात देऊन सामाजिक बांधिलकीतून अन्न, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात काम करीत ज्ञानदानासारख्या पवित्र कार्याला मदत केल्याचे केंद्रप्रमुख प्रभाकर कोळेकरांनी सांगितले. यावेळी तालुक्यातील पळचिल प्राथमिक, माध्यमिक शाळा, राजीव कातळी बंगला, राजीप गोलदरा, खेड तालुक्यातील कशेडी गावणकर वाडी, कशेडी लिटी, खवटी माध्यमिक शाळा, महाड तालुक्यातील रावतळी मानेधार या शाळेतील व परिसरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



### जागतिक एकल महिला दिन साजरा

**मुरुड जंजिरा :** तेलवडे येथील अंगणवाडी केंद्रामध्ये जागतिक एकल महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमाचे आयोजन एकल महिलांच्या संघर्षाला सलाम करण्यासाठी आणि समाज प्रबोधनासाठी करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आयसीडीएस विभाग मुरुड प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणेच्या समतादूत वैशाली पेरवे-खरपडे, अंगणवाडी सेविका कामिनी म्हात्रे व अश्विनी पाटील, तसेच मदतनीस प्रियंका अवघडे आणि गावातील एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान समाजातील विधवा, परित्यक्ता, लग्न न झालेल्या मुली, घटस्फोटीत महिला अशा महिलांना २३ जूनपासून एकल महिला संबोधण्यात येत आहे आणि शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी व एकल महिलांविषयक योजनांची सविस्तर माहिती महिलांना देण्यात आली.



### अध्यक्षपदी शैली मेहता यांची निवड

**खोपोली :** लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे अध्यक्ष आणि पदाधिकारी निवड सोहळा लायन्स क्लबच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. लायन रुचीरा मेहरा यांच्या प्रमुख उपस्थित सोहळा पार पडला. अध्यक्षपदी शैली मेहता, सेक्रेटरीपदी एकता भदोरिया आणि लायन परिना ओसवाल यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी खोपोली नगरपालिकेचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, खोपोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे, लायन्स क्लबचे आजी-माजी पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मित्रपरिवार उपस्थित होता. तर मावळते अध्यक्ष ला. अविनाश राऊत यांनी सहकार्य केलेल्या सर्वांचे ऋण व्यक्त केले. तर नवनिर्वाचित अध्यक्षा लायन शैली मेहता यांनी उपस्थित प्रत्येक मान्यवरांना एक झाडाचे रोप भेट दिले आणि ते रोप लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. पुढील वर्षात क्लबच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विविध वैद्यकीय प्रोजेक्ट्स राबवले जातील, अशी ग्वाही शैली मेहता दिली.




### माथेरान पतसंस्थेचा वर्धापनदिन

**माथेरान :** माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेचा ८७ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून हुतात्मा स्मारकाजवळ पतसंस्थेच्या वतीने दुसऱ्या एटीएम मशीनचे उद्घाटन संस्थेचे विद्यमान सभापती अजय सावंत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी पतसंस्थेच्या उप सभापती विनंती घावरे, सचिव योगेश जाधव, सदस्य विवेक चौधरी, विजय कदम, रामचंद्र ढेबे, स्वाती कुमार, कुलदीप जाधव, चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, विजय सावंत, नितीन शेळके, अनंत शेलार, संदीप शिंदे, दत्ता सनगरे, अनिल गायकवाड, मंगेश सकपाळ, उपनगराध्यक्ष संतोष शेलार, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, नगरसेवक प्रवीण सकपाळ, सचिन दाभेकर, किरण पेमारे, नगरसेविका रिझवाना महापुळे यांसह नागरीक उपस्थित होते.

### अपंग विद्यार्थ्यांना व्हीलचेअर भेट

**नेरळ :** अंध, अपंग विकास संस्था, वारे आणि अंध अपंग सामाजिक विकास संस्था, नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील ५५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नेरळ येथील बापुराव धारप सभागृहात अंध, अपंग संस्थेच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नेरळ विद्या विकास मंदिर आणि रायगड जिल्हा परिषद शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तर ५५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. काही अपंग विद्यार्थ्यांना व्हील चेअर देऊन मदत करण्यात आली.



## निवडक



### कोनायन्स स्कूलचा वर्धापन दिन

**पेण :** एनव्हीजी एज्युकेशन फाऊंडेशन संचलित कोनायन्स स्कूलचा सातवा वर्धापन दिन नुकताच प्रशालेच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. मनीष वनगे यांच्यासह ॲड. मंगेश नेने, डॉ. सोनाली वनगे, ज्योती गुरव, प्रकाश गुरव, ॲड. अधिराज नेने आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख अतिथींचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शैक्षणिक, क्रीडा व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यानंतर प्रशालेतील शिक्षकांनी शाळेच्या सात वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेत मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनीही शाळेबद्दलच्या भावना आणि अनुभव उपस्थितांसमोर मांडले. मान्यवरांपैकी ॲड. मंगेश नेने, ॲड. अधिराज नेने, डॉ. सोनाली वनगे आणि डॉ. मनीष वनगे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. अवघ्या ८७ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या शाळेने आज १,१७५ विद्यार्थ्यांपर्यंत मजल मारली असून नर्सरी ते बारावीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रातील प्रगतीलाही शाळेत विशेष महत्त्व दिले जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका सुप्रिया वेखंडकर यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. अहाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### कर्जत नगरपरिषदकडून झाडांची छाटणी

**नेरळ :** कर्जत शहरातील विजेच्या वाहिन्यांवर आलेल्या झाडाच्या फांद्यांची छाटणी करण्याचे काम कर्जत नगरपरिषदकडून करण्यात आले. शहरातील झाडांची छाटणी करण्यासाठी विजेचा ब्लॉक घेण्यात आला होता. शहरातील सर्व प्रभागात विजेच्या वाहिन्या आणि पथदिव्यांच्या आड येत असलेल्या झाडांची छाटणी करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. कर्जत नगरपरिषदेचे सर्वसाधारण मीटिंगमध्ये शहरातील पथदिवे यांच्या आजुबाजूला झाडांच्या फांद्या आल्याने रस्त्यावर विजेचे प्रकाश व्यवस्थित पडत नसल्याचे तक्रारी लोकप्रतिनिधी यांनी केल्या. त्यावेळी नगराध्यक्ष पुष्पा दगडे, संतोष पाटील, महेंद्र चंदन, ॲड. संकेत भासे यांनी हे काम तातडीने करण्यास मान्यता दिली. त्यानंतर मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी शहरातील सर्व प्रभागातील रस्त्याच्या आजू-बाजूला विजेच्या वाहिन्या आणि पथदिव्यांचा आडोसा ठरत असलेल्या झाडांची छाटणी करण्याचे जाहीर केले. त्यानुसार सर्व दहा प्रभागातील रस्त्यांच्या आजू-बाजूचे झाडांची छाटणी करण्यात आली.





### शेतकऱ्यांची पेरण्यांच्या कामाला गती

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील १० हजार हेक्टर जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तब्बल १५ दिवस उशिराने मोसमी पावसाचे आगमन झाले आहे. शेतकऱ्यांनी भाताची शेती करण्यासाठी राभ भरणी करण्यास सुरुवात केली असून पेरण्यांची कामे वेगाने पुढे जात आहेत. दरम्यान, कर्जत तालुक्यात संकरित बियाण्यांची लागवड करण्यावर शेतकऱ्यांनी भर दिला असल्याचे दिसून येत आहे. मात्र, मागील काही वर्षात पावसाचे ऋतुचक्र बदलले असून गतवर्षी संपूर्ण मे महिना पावसाने झोडपून टाकले होता. परंतु, यावर्षी २२ जून रोजी पहिला पाऊस पडला आणि खऱ्याअर्थाने मोसमी पाऊस सुरू आहे. पावसाळा सुरू झाल्याची खात्री होताच शेतकऱ्यांनी भाताची रोपे तयार करण्यासाठी राब भरणी आणि पेरण्या करण्यास सुरुवात केली आहे. सध्या ट्रॅक्टर आणि नांगरांच्या सहाय्याने नांगरणी सुरू असून भाताचे बियाणे टाकून पेरणी करण्यावर शेतकऱ्यांनी भर दिला जात आहे.

### उरण उप-टपाल कार्यालयाचे स्थलातंर

**उरण :** नवी मुंबई डाक विभागाच्या अंतर्गत येणारे उरण उप-टपाल कार्यालय नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. उरण टपाल कार्यालय हे आता दुकान क्र. १०४ आणि १०५, पहिला मजला, पुष्कराज अपार्टमेंट, कामठा रोड, उरण, तालुका-उरण, जिल्हा-रायगड या नवीन पत्त्यावर स्थलांतरित झाले आहे. त्यामुळे जुन्या कार्यालयाच्या ठिकाणी जाणाऱ्या नागरिकांची तसेच ग्राहकांची कोणतीही गैरसोय होऊ नये आणि टपाल सेवा अखंडितपणे सुरू राहावी, यासाठी प्रशासनाकडून ही माहिती जाहीर केली आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : रु १५,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फॅमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555
- **आर्किटेक्चर आणि इन्टेरियर** डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क - 9762777975
- **वाडगाव फाटा येथे कॉटेज** सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क - 9822938444
- **रखवालदार/सफाईकामगार** पाहिजे संपर्क-८७८८०२१५१०
- **ड्रायव्हर पाहिजे** संपर्क - ९४२२६९४२०३
- **ऑफिस स्टाफ आवश्यक,** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS. महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर,अलिबाग, जि. रायगड ऑफिस स्टाफची आवश्यकता. संपर्क : ९९२३७५०५४९, ९१५०७१७०३८
- **मंगल ग्रेन स्टोअर्स बाजारपेठ** अलिबागमध्ये कामासाठी मुल व मुली पाहिजेत. संपर्क : ७८७५९९००९२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# एसटी चालक, वाहकांना नागोठण्याचे वावडे

## उड्डाणपुलावरून चालक करताहेत हवाई सफर; प्रवासी, विद्यार्थ्यांतून तीव्र संतापाची लाट

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील महत्वाचे व मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागोठण्यात सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या कोकणात जाणाऱ्या काही एसटी गाड्या नागोठण्यात न थांबता नागोठण्यातील उड्डाण पुलावरून हवाई सफर करीत जात आहेत. त्यामुळे मुंबई, पनवेल वरून येणाऱ्या प्रवाशांचे तसेच नागोठण्यात कोएसोचे व भारतीय एज्युकेशन सोसायटीमध्ये विविध प्रकारचे उच्च शिक्षण घेण्यासाठी येणारे व नागोठण्यावरून कोलाड, माणगावकडे जाणारे येथील मोठ्या संख्येतील महाविद्यालयीन विद्यार्थी व प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. एसटी चालक व वाहकाच्या या गैरवर्तणुकीकीमुळे नागोठण्यातील प्रवासी व स्थानिक नागरिकांतून एसटीच्या चालक व वाहकांविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

नागोठणे जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे नागोठणे हायवेनाका येथील उड्डाण पूल वाहतुकीस खुला होण्यापूर्वी हायवेनाका येथे एसटीच्या कोकणात व मुंबईकडे जाणाऱ्या सर्व गाड्या प्रवाशांसाठी थांबविण्यात येत होत्या.

मात्र, सद्य स्थितीत नागोठण्यातील हायवेनाका येथील उड्डाण पूल पनवेल, मुंबईकडे व कोकणात जाणाऱ्या सर्व वाहनांसाठी काही दिवसांपूर्वीच खुला करण्यात आला आहे. मात्र, असे असले तरी नागोठण्यातील हायवेनाका येथील उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूला असलेल्या सर्व्हिस रोड वरूनच मुंबई व कोकणात जाणाऱ्या एसटी चालकांनी गाडी नेणे बंधनकारक असताना राज्य परिवहन महामंडळाच्या माणगाव, महाड, श्रीवर्धन व पोलादपूर व कोकणातील काही एसटी आगाराच्या काही बसेस सर्व्हिस रोडवरून येत नाहीत. या बसेस परस्पर हायवेनाका येथील उड्डाण पुलावरून जात आहेत.





उड्डाण पुलावरून महाडकडे जाणाऱ्या या एसटी बसेस नागोठण्यातील प्रवाशांना उड्डाण पुलाचे संपत असलेले आय टी आय कॉलेज समोर तर मुंबईकडे जाणाऱ्या एसटी बसेस नागोठण्यातील प्रवाशांना आंगर आळी येथे उतरत आहेत. त्यामुळे नागोठण्यातील प्रवाशांना एकतर पायी चालत किंवा रिक्षा करून आर्थिक भुर्दंड सहन करून नागोठण्यात जावे लागत आहे. त्यामुळे या बसेसना जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागोठणे शहराचे वावडे का ? असा प्रश्न उपस्थित करून प्रवाशांतून व नागोठणेकरांतून उपस्थित करून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

> "एसटीचा कुणी चालक जर नागोठणे येथील सर्व्हिस रोडवरून गाडी न नेता उड्डाण पुलावरून गाडी नेत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच अशा वाहनचालकांवर लक्ष ठेवण्यासाठी नागोठणे हायवेनाका येथील महामार्गावर एसटीचे भरारी पथक तैनात करण्यात येणार आहे."
>
> **- सुहास चौरे**
> राज्य परिवहन महामंडळाचे रायगड जिल्हा वाहतूक नियंत्रक

## दुर्गासागर धरणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**| तळा | प्रतिनिधी |**

तळे येथील धरणला १९७३ सालच्या दरम्यान, तळ्याचे सुपुत्र तथा माजी केंद्रीय अर्थमंत्री सी. डी देशमुख यांच्या हस्ते दुर्गासागर धरणाचे भूमीपुजन करण्यात येऊन १९७४/७५ सालात घरोघरी पाणी पोहोचवून पिण्याच्या पाण्याच्या असणाऱ्या दुर्भिक्षापासून काहिसा दिलासा मिळाला.



नागरिक सुखावले गेले पाण्याच्या दुर्भिक्षामुळे गाव सोडून गेलेले परत घराकडे परतले जवळ पास ५० वर्षानी धरणाच्या पाण्याने तळ गाठला. कोरडे पडले मासे पाण्याविना तडफडून मेले आहेत.

प्रतिवर्षीपेक्षा यंदा पाण्याची भूगर्भातील पातळी कमीझाली झाल्याने संपूर्ण राज्यात पाण्याची टंचाईचे संकट ओढावले शहरातील हे धरण कोरडे पडले या धरणाच्या पाण्याचा वापर वडाचीवाडी, कुंभार आळी पुसाटी वाडी, पुष्पवाटीका वरचा मोहल्ला समर्थनगर अशा भागात केला जातो.

प्रतिवर्षी या भागात मार्च ते जून या चार महिन्यात पाणी टंचाईला सामोरे लागते धरणाजवळील बोअरवेलमधून होणाऱ्या पाणीपुरवठा पाण्याची पातळी खाली गेल्याने अधिक झळ बसत आहे.

नगरपंचायत प्रशासनाला याची पुर्ण जाणीव असूनही अर्थसंकल्पात धरणाच्या गाळ काढण्याची आर्थिक तरतूद केली जात नाही. किंवा इतर फंडाची व्यवस्था केली नाही मात्र मोदी तलाव सुशोभीकरणासाठी ३० लक्ष रु. निधी उपलब्ध करून काय साध्य केले हे करण्याऐवजी धरणाच्या गाळ काढण्यासाठी केला असता तर अधिक चांगले झाले असते.

गेल्या पन्नास वर्षात केले नसल्याने धरणाची खोली कमी झाल्याने पाणीसाठा कमी होत आहे. धरण उशाला कोरड घशाला अशीच म्हणण्याची वेळ आता तळेकरांवर आली आहे.

## विंटेज गाडीने वेधले लक्ष



**पनवेल :** खांदा कॉलनी पनवेलच्या रस्त्यांवर लग्नसराईच्या निमित्ताने जुन्या राजेशाही थाटाची आठवण करून देणाऱ्या विंटेज गाड्या पाहायला मिळत आहेत. एकेकाळी राजे-महाराजे आणि प्रतिष्ठित घराण्यांच्या ताफ्यात असलेल्या अशा गाड्या आज मॉडिफिकेशन करून विवाह सोहळ्यांमध्ये आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. पारंपरिक सजावट आणि ऐतिहासिक रचना यामुळे नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.



## म्हसळा न.प.तर्फे महिलांचा सन्मान

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त मंगळवारी (दि. २३) जून म्हसळा नगरपंचायत येथे एकल महिला दिन म्हणून आयोजित करण्यात आला. त्या अनुषंगाने महात्मा जोतीबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त नगराध्यक्ष सुनिल शेडगे, म्हसळा नगरपंचायत मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, राखी करंबे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच एकात्मिक बालविकास सेवा योजना सुपरवायसर साधना प्रसाद पागी यांनी या कार्यक्रमात विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित आणि निराधार महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व लाभ याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

याप्रसंगी कार्यक्रमास म्हसळा नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस व अशा सेविका यांनी सहयोग घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

## आदिवासी विद्यार्थ्यांनी गिरवले योगाचे धडे

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून वावळोली येथील शासकीय आश्रमशाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनुराधा गुरव आणि स्वाती मिरकुटे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचे पालन करत विद्यार्थ्यांनीही अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहाने या योगाभ्यासात भाग घेतला. नियमित योगासने केल्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य निरोगी व सुदृढ राहण्यास कशी मदत होते, याबाबत या वेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत आनंदी आणि चैतन्यमय वातावरणात पार पडला. दैनंदिन जीवनात नियमित योग करण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कुणबी समाजोन्नती मंडळातर्फे गुणवंतांचा सत्कार

**| महाड | प्रतिनिधी |**

कुणबी समाजोन्नती मंडळ, महाड-पोलादपूर रावढळ गटातर्फे १० वी, १२ वी व पदवीधर गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी बहुउद्देशीय सभागृह, गोठे बुद्रुक येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा सोहळा रावढळ गटाचे अध्यक्ष नामदेव घाणेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या दिमाखदार कार्यक्रमात सन २०२५-२६ मधील शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसह, मुंबई पोलीस दलात सेवेत भरती झाल्याबद्दल अस्मिता रेवाळे (बैकर) व सेजल यादव आणि विधी क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवल्याबद्दल ॲड. मानसी निर्मळ यांच्यासह एकूण ८७ गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



या सोहळ्यास विलास राक्षे, कृष्णा सुकूम, बबन जाबडे, नारायण गोडांबे, दत्ताराम अडखळे, एकनाथ सुकूम, साक्षी बटावले, राजेश सुकूम, रमेश खिडबिडे, सुभाष लाले, संतोष बटावले, रघुनाथ भागवत, वसंत साळुंखे, ज्ञानेश्वर सांगळे, मिलिंद देशपांडे, शिक्षक शेळके व दवंडे, विजय बैकर, काशिराम भुवड, लक्ष्मण आग्रे, सत्यवान रसाळ, प्रकाश गोलांबडे, विजय जाधव, रामा आग्रे आणि विनय बटावले आदी उपस्थित होते.

गुणगौरव सोहळा यशस्वी करण्यासाठी रावढळ गट शिक्षण कमिटीचे अध्यक्ष अंकुश जाधव, विजय गोलांबडे, संतोष तांबे, राजेंद्र चोरगे, किरण बोटेकर आणि अनिल किजबिले यांनी विशेष मेहनत घेतली.

## आंबेवाडी पुलावर अपघाताचा धोका

**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील आंबेवाडी बाजारपेठेत उड्डाण पुलाचे काम सुरु आहे. तसेच पुलाच्या संरक्षण कठड्याचे काम अपूर्ण स्थितीत आहेत. अशा परिस्थितीत या उड्डाण पुलावरून वाहतूक सुरु करण्यात आली आहे. यामुळे प्रवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत वाहतूक सुरु करण्याची घाई का? का वाहतूक सुरु करून उड्डाण पुलाचे काम पूर्ण झाले हे भासवून खांब येथील टोल नाका सुरु करण्याचा तर शासनाचा बेत नाही ना? असा संतप्त सवाल नागरिकांकडून करण्यात येत आहे.



महामार्गांवरील आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम अपूर्ण स्थितीत असतांना महाडकडून मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी खुळा करण्यात आला आहे. परंतु, पूलाच्या काही बाजूचे संरक्षण कठडे अपूर्ण स्थितीत फक्त स्टील उभे करण्यात आले असल्याचे दिसून येत आहे. यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

विशेषतः या पुलावर कोणतेही लाईटची सोय नाही, यामुळे रात्रीच्या वेळी अंधारातून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो. संरक्षण कठडा नसल्याने वाहनावरील नियंत्रण सुटल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे संबंधित विभाग व प्रशासन यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना करावी अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

## शिवतांडव पथकाचा सराव उत्साहात



**| महाड | प्रतिनिधी |**

महाडमधील शिवतांडव ढोल-ताशापथकाने गणेशोत्सवासाठीच्या सरावाला प्रारंभ केला आहे. वाद्यपूजन करून सराव शुभारंभ करण्यात आला. गेल्या १३ वर्षांपासून शिवतांडव ढोल-ताशा पथकाने महाड, इस्लामपूर, खेड, श्रीवर्धन, लोणावळा यांसह अनेक ठिकाणी गणेशोत्सव आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आपल्या दमदार वादनाने विशेष ओळख निर्माण केली आहे. यावेळी पथकातील दहावी-बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या वादकांचा सत्कार करण्यात आला. तसेच वकिली व्यवसायात पदार्पण केलेल्या गायत्री चौगुले यांचा मंडळाच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आल्याचे मंडळाचे अध्यक्ष कल्पेश पाटील, यांनी सांगितले.

### सीक्रेट पॉईंट 'अंधारबन' व 'खजिना ट्रेक'वर शांतता स्थानिक व्यावसायिकांचे मोठे नुकसान

## पावसाअभावी ताम्हिणी घाट, देवकुंड ओस

**| पाली/ वाघोशी | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यातील पाटणूस, भिरा, विळे, रवाळजे व पुण्याच्या सीमेवर असलेला ताम्हिणी घाट आदी परिसरात निसर्गाचा अमूल्य ठेवा दडला आहे. येथील अद्वितीय देवकुंड, रोमहर्षक खजिना व अंधारबन ट्रेक, समृद्ध निसर्ग, फेसाळणारे धबधबे देशभरातील पर्यटकांसाठी दरवर्षी पावसाळी पर्यटनाची मोठी पर्वणी ठरते. मात्र, यंदा जूनचा पंधरवडा उलटून गेला तरी जिल्ह्यात पावसाचे दमदार आगमन न झाल्याने या संपूर्ण परिसरातील पावसाळी पर्यटनाचा पुरता हिरमोड झाला आहे. पाऊस लांबल्याने पर्यटक नाराज असून, पर्यटक व निसर्गप्रेमींनी या भागाकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे.

दरवर्षी या दिवसांत ताम्हिणी घाटात सह्याद्रीच्या उंच व रांगड्या डोंगररांगांवरून कोसळणाऱ्या पांढऱ्याशुभ्र धबधब्यांच्या फेसाळणाऱ्या पाण्यात भिजण्यासाठी आणि धुक्याची चादर अनुभवण्यासाठी देशभरातून पर्यटक येथे मोठी गर्दी करतात. कुंडलिका नदीचे उगमस्थान असलेल्या देवकुंड येथील निसर्गसौंदर्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. मात्र, यंदा पावसाअभावी येथील जलप्रपात आणि ट्रेकिंगचे मार्ग अद्याप कोरडेच असल्याने सर्व पर्यटन स्थळांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

माणगाव तालुक्यातील पाटणूस, भिरा, विळे व रवाळजे ही गावे सह्याद्रीच्या कुशीत वसली असून, त्यांच्या अवतीभवती अजस्त्र पर्वत रांगा आहेत. या परिसरात नैसर्गिक जैवविविधता प्रचंड आहे. सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरून कोसळणारे धबधबे पुढे नदीरूपाने अरबी समुद्राकडे आगेकूच करतात. परंतु, यंदा पावसाने दडी मारल्यामुळे हे विलोभनीय दृश्य अजूनही पाहायला मिळालेले नाही.

भिरा येथील मदेवकुंडफ हे झपाट्याने पर्यटनाच्या नकाशावर आलेले सर्वात प्रसिद्ध व विलोभनीय ठिकाण आहे. येथूनच कुंडलिका नदीचा उगम होतो. या भागात पर्यटकांची संख्या दरवर्षी लाखांच्या घरात जाते. तसेच खजिना व अंधारबन डोंगरावरील ट्रेक प्रसिद्ध असून, येथे दुर्मिळ गिधाडांचे वास्तव्य आहे. या उंच डोंगरावरून भिरा धरणाचा विस्तीर्ण जलाशय, नद्या व आकर्षक परिसर दृष्टिक्षेपात येतो. मात्र, सद्यस्थितीत पाऊस नसल्याने येथील पर्यटन थांबले आहे.

विळ्यापासून पुण्याकडे जाताना सुरू होणारा ताम्हिणी घाट पावसाळ्यात जणू स्वर्ग भासतो. घाटातील एका बाजूला डोंगर, दुसऱ्या बाजूला दरी, खाली उतरलेले ढग आणि हिरवागार निसर्ग पाहून पर्यटक चिंब भिजण्याचा आनंद घेतात. तसेच कुंडलिका नदीतील व्हाईट वॉटर रिव्हर राफ्टिंग चा आनंद घेतात. मात्र पावसाअभावी या ठिकाणी पर्यटकांचा हिरमोड झाला आहे.

> "सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या आमच्या विभागाला निसर्गाची मोठी देणगी लाभली आहे. देवकुंड, ताम्हिणी घाट, अंधारबन ट्रेक, सिक्रेट पॉईंट याठिकाणी देशभरातून पर्यटक येतात. मात्र, यंदा पाऊस लांबल्याने पर्यटकांची पावले थबकली आहेत. याचा थेट फटका स्थानिक व्यावसायिकांना बसला आहे. लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आदिवासींचा रोजगारही हिरावला आहे. आम्ही सर्वजण आता दमदार पावसाची प्रतीक्षा करत आहोत."
>
> -आंदेश दळवी,
> व्यावसायिक, पाटणूस

# रेवदंडा पंचक्रोशीतील शेतकरी सुखावले

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा व पंचक्रोशी परिसरात अखेर मान्सूनने दमदार आगमन होत पावसाच्या सरी कोसळल्या. गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला असून शेतकरी व बागायतदारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पावसामुळे भात पेरणीसाठी आवश्यक ओलावा निर्माण झाला असून आंबा, नारळ, सुपारी व इतर फळबागांनाही मोठा फायदा होणार आहे. पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून परिसरातील नद्या, ओढे व जलस्रोतांमध्ये पाण्याची आवक सुरू झाली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस रायगड जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तविला असून शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी सुरू केली आहे. पावसाच्या आगमनामुळे ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या एकुण क्षेत्र ०-४१-६० हे. आर यापैकी ०-१६-०० हे. आर क्षेत्र या मिळकतीचे विद्यमान मालक आनंदी दामू ठाकुर, सरस्वती गजानन तेलगे, अनिता अनंत पाटील, मनोहर दामू ठाकूर सर्व राहणार चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चिंचोटी ता. अलिबाग, जि. रायगड | ५३/७ | ०-४०-८० <br> पो.ख. ०-००-८० <br> एकूण ०-४१-६० <br> पैकी ०-१६-०० | २-२५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, सही/-
दि. २४.६.२०२६
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक कार्यालय अलिबागच्या समोर अलिबाग,
जि. रायगड मो.नं. ९८९००७९३०२

**महाड नगर परिषद, महाड**
**छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन,**
**महाड जि. रायगड. पिन : ४०२३०१**

दुरध्वनी व फॅक्स क्रमांक : ०२१४५-२२२३७४ Email : mahadnagarpalika@gmail.com
मुख्याधिकारी (दुरध्वनी) : ०२१४५-२२२२५५ coud.mahad@maharashtra.gov.in
जावक क्र.म.न.प./बन्गर रचनाविभाग/५६९/२०२६-२०२७ दिनांक :- २४/०६/२०२६

**जाहीर ई निविदा सूचना सन २०२६-२७**

महाड नगरपरिषद हद्दीतील खालील कामासाठी ऑनलाईन पद्धतीने टक्केवारी दराच्या ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | महाड नगरपरिषद हद्दीतील क्षेत्राचा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१ ते ३१ नुसार भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे विकास योजना (दुसरी सुधारणा) तयार करणे. तसेच नगर परिषद हद्दीतील रस्त्यांचे/चौकांचे जमीन योजना प्रमाणित करणे करिता सल्लागार सेवा पुरविणे. | १,८६,८२,७५२/- |

तरी सदर कामांसाठी इच्छुक निविदा धारकांनी त्यांच्या निविदा नगरपरिषदेच्या अटी व शर्तीस अधीन राहून http://www.mahatenders.gov.in येथे ऑन लाईन पद्धतीने सादर कराव्यात. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १०/०७/२०२६ अशी राहील.

सही/- सही/-
**(धनंजय कोळेकर)** **(सुनील वसंत कविस्कर)**
मुख्याधिकारी नगराध्यक्ष
महाड नगरपरिषद महाड नगरपरिषद

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अविनाश माधव गद्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे | ५५४/२ | ३-९६-९० <br> पो. ख. ०-०९-०० <br> ४-०५-९० | ०.०० |

पैकी ० हे. ६३.४० आर एवढ्या मिळकतीपैकी ० हे. २२ आर एवढी मिळकत सदर ० हे. २२ आर मिळकतीस चतुःसीमा :-
पूर्वेस :- मौजे धोकवडे गट नं. ५५४ २ या मिळकतीचा उर्वरित भाग.
पश्चिमेस :- गाव रस्ता व मौजे धोकवडे गट नं. ५५४/२ पैकी उर्वरित भाग.
दक्षिणेस :- मौजे धोकवडे गट नं. ५५४/२ या मिळकतीचा उर्वरित भाग.
उत्तरेस :- काही भागास लागून मौजे धोकवडे गट नं. ५५४/२ चा उर्वरित भाग व काही भागास लागून गट नं. ५५४/१ या मिळकतीची हद्द.
तसेच त्या मिळकतीमध्ये असलेले ग्रुपग्रामपंचायत धोकवडे, घर नं. १९८ ही शेतघर मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग सही/-
तारीख : २५/६/२०२६
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी
अलिबाग, रायगड, ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, यांनी जमीन मालक १.प्रकाश बाबुलाल ओसवाल, २. सुरेश शेषमल ओसवाल, ३. चंदनमल प्रतापमल शहा यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे - टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकती**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | २/९ | ०.४१.०० | ०.४२ |
| २ | २०/१०/ब | ०.४३.०० | ०.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
कर्जत दि. २५/०६/२०२६
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड,
पिन - ४१०२०१. मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**
ज.म.र अर्ज १२/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति, श्री. तबरेज म. सईद जहाँगीर,
रा. पेठ मोहल्ला मुरुड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

मुख्याधिकारी,
नगर परिषद मुरुड-जंजिरा, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०१-०८-१९७६ रोजी मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद मुरुड-जंजिरा, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०१-०८-१९७६ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ०१/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १५/६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, केंद्र कार्यालय अलिबाग**

## निविदा सूचना

आपल्या बँकेच्या इंदापूर, ता.माणगाव, घोसाळे, ता.रोहा व माणगाव, ता.माणगांव या शाखांकरीता अंदाजे २००० ते २५०० चौरस फुट बांधकाम केलेली अथवा मोकळी जागा मालकी हक्काने खरेदी करावयाची आहे.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ०५.७.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नांवाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयात मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची, कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग सही/-
दिनांक - २५.०६.२०२६ **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

दिनांक २४/०६/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी खालील वर्णनाची मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याची आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**जिल्हा परिषद रायगड, दुय्यम निबंधक सा़े. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे | जमिन मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| सतघर ता.अलिबाग | ३ | ०-२७-२० <br> पो.ख.०-०६-५० <br> एकूण ०-३३-७० | ०६.८९ | प्रभाकर रघुनाथ पाटील |

वरील वर्णनाची जमिन मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे, जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क, कुळअखत्यारपत्र आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. रोहित अरुण पाटील**
जिल्हा व सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग.
रुम. नं.५, सागर दर्शन प्लाझा बिल्डिंग,
समाधान हॉटेलसमोर, कलेक्टर ऑफिसजवळ,
पक्षकाराच्या मान्यतेची सही — रामनाथ रोड, अलिबाग. ४०२ २०१
मो. ९७६३८८८८४५/८३७८००९९९९

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे मांडवे तर्फे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक प्रतिक्षा नरेंद्र तुरे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे मांडवे तर्फे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मांडवे तर्फे बामणगांव ता.अलिबाग | ६९ | ०-५८-०० <br> पो.ख. ०-०१-७० <br> एकुण ०-५९-७० | ६.५८ |

वर नमुद मिळकतीमधील प्रतिक्षा नरेंद्र तुरे यांच्या असलेल्या अविभक्त हिश्याबाबत

दिनांक : २५/०६/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

दिनांक :- २४/०६/२०२६

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री. अनिरुद्ध अनंत खडे, श्री. जितेंद्र शिवाजी बिबवे व श्री. रोहन अरुण घाग यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताबे वहिवाटीच्या असून, सदरील विद्यमान मालकांनी सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच त्यांनी सदर मिळकती ही पुर्णत: निर्वेध व निर्जोखिम असून, त्यांना सदरील मिळकती विकण्याचा, पुर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. सबब सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसलाही करार, मदार, गहाण, दान, लिज, लिन, पोटगी इ. अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर कोणत्याही प्रकारचे महसुली अगर दिवाणी दावे प्रलंबित असल्यास, प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. उपरोक्त मुदतीत हरकत न आल्यास, सदरील मिळकत ही पुर्णत: निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असून विद्यमान मालकांस तिचे पूर्ण मार्केटेबल टायटल आहे, तसेच अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, अधिकार व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचाही कसलीही हरकत/तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मोग्रज, तालुका कर्जत, जिल्हा रायगड.**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | शेतकऱ्याचं नाव | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३५/१७ | श्री.अनिरुद्ध अनंत खडे, <br> श्री.जितेंद्र शिवाजी बिबवे <br> श्री.रोहन अरुण घाग | ०-४०-४८ | ०.२६ |

वरील ७/१२ चे एकूण क्षेत्र ०-६३-०० हे.आर.चौ.मीटर व आकार ०.३५ रू.पै असे असून त्यापैकी सामाईक विक्री क्षेत्र ०-४०-४८ हे.आर.चौ.मीटर व आकार ०.२६ रू.पै असे आमचे अशिल यांनी विकत घेण्याचे मान्य केले आहे.

येणेप्रमाणे नोटीस दिली.
कर्जत
दिनांक :- २४/०६/२०२६

**ॲड. रॉबीन चाळके**
शॉप नं. ५, गायत्री संकुल सोसायटी,
प्लॉट नं. ३८, सेक्टर २०, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड
मोबा. नं. ७०४५०९२९९०
ईमेल.robinglc@rediffmail.com

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

शासनाच्या दि. २२.०५.२०२६ च्या पत्राला अनुसरून इरादीत तथापि वाटप न झालेल्या व इतर प्रलंबित भूखंड वाटपाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कालबद्ध कार्यक्रम आखून नोडनिहाय शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नोड | दिनांक पासून | दिनांक पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | द्रोणागिरी | ०६/०७/२०२६ | १०/०७/२०२६ |
| २. | जेएनपीए | १३/०७/२०२६ | १७/०७/२०२६ |
| ३. | कामोठे/आसुडगाव | २०/०७/२०२६ | २४/०७/२०२६ |
| ४. | करंजाडे/कालुंद्रे | २७/०७/२०२६ | ३१/०७/२०२६ |
| ५. | तळोजा/खारघर/नावडे | ०३/०८/२०२६ | ०७/०८/२०२६ |
| ६. | कळंबोली/रोडपाली | १०/०८/२०२६ | १४/०८/२०२६ |
| ७. | ठाणे | १७/०८/२०२६ | २२/०८/२०२६ |

**भूमी विभाग १२.५ योजनेअंतर्गत वाटपासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | तपशील | कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | निवाडा | साक्षांकित प्रत |
| २. | सी.सी. | साक्षांकित प्रत |
| ३. | कब्जेपावती | साक्षांकित प्रत |
| ४. | ७/१२ उतारा | साक्षांकित प्रत |
| ५. | कार्यालयीन ओळखपत्र | नोटराइज्ड प्रत |
| ६. | रहिवाशी दाखला | मूळ प्रत |
| ७. | रेशन कार्ड, मतदान, ओळखपत्र पॅनकार्ड, आधार कार्ड | स्वयंप्रमाणित |
| ८. | मृत्यू दाखला (मूळ भूधारक मयत असल्यास) | साक्षांकित प्रत |
| ९. | वारस दाखला | नोटराइज्ड प्रत |
| १०. | वारस दाखल्याचे प्रतिज्ञापत्र* | नोटराइज्ड प्रत |
| ११. | वारस दाखल्याचे दिवाणी चौकशी अर्ज | कोर्टाकडील |
| १२. | हमीपत्र* | नोटराइज्ड प्रत |
| १३. | बंधपत्र* | नोटराइज्ड प्रत |
| १४. | प्रतिज्ञापत्र* | नोटराइज्ड प्रत |

(*५००/-रुपयांच्या स्टॅम्पपेपर सोबत)

उक्त नमूद कालावधीत भूधारकांनी **सोमवार ते शुक्रवार (सुट्टीचे दिवस वगळून) दुपारी २ ते ५** या वेळेत **सिडको भवन, तळ मजला, भूमी १२.५% विभाग, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४** येथे सोबत जोडलेल्या कागदपत्रांसमवेत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(ठाणे/रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१२२/२०२६-२७

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग-रायगड**
**सभेची नोटीस**
**(बँकेच्या व्यक्तिगत भागधारकांसाठी)**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबागच्या व्यक्तिगत भागधारकांची सभा शनिवार दिनांक ११.०७.२०२६ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग येथील सभागृहात बोलविण्यांत येत आहे. तरी सर्व व्यक्तिगत भागधारकांनी सदर सभेस हजर रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

विषय क्र.१-बँकेच्या पोटनियम क्रमांक २४ व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व नियम १९६१ नुसार वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करणेसाठी प्रतिनिधीची निवड करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
अलिबाग **मंदार मनोहर वर्तक**
दिनांक : २५.०६.२०२६ **मुख्य कार्यकारी अधिकारी**

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग**
**६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग या बँकेची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ११.०७.२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता रायगड जिल्हा मध्यवर्ती सह.बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग येथील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात बँकेचे चेअरमन मा.श्री.जयंत प्रभाकर पाटील यांचे अध्यक्षतेखाली भरणार आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज केले जाईल. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहणे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील दिनांक ३०.०८.२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) सन्मा.संचालक मंडळाने तयार केलेला सन २०२५-२०२६ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) सन्मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२०२६ सालच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
४) सन २०२५-२०२६ सालचे अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्षात झालेल्या खर्चास व उत्पन्नास तसेच सन २०२६-२०२७ या सालाकरीता सन्मा.संचालक मंडळाने सूचविलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५) बँकेच्या सन २०२५-२०२६ सालच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६) बँकेच्या सन २०२६-२०२७ या वर्षाचे लेखापरिक्षण करणेसाठी सहकार खाते/नाबार्डचे मंजूर पॅनलवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.
७) सामोपचार कर्ज परतफेड योजनेस सन २०२६-२०२७ या वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबत विचार करणे.
८) सामोपचार परतफेड कर्ज योजनेअंतर्गत कर्ज पूर्ण फेड झालेल्या तसेच मा.संचालक मंडळाने मंजूर केलेल्या प्रकरणांना अंतिम मान्यता देणेबाबत विचार करणे.
९) वैयक्तिक कर्जदार सभासद/संस्थांकडील कर्जखात्यांचे कर्जवसूलीचे हक्क अबाधित ठेवून निर्लेखन केलेल्या कर्ज प्रकरणांना अंतिम मान्यता देणेबाबत विचार करणे.

मा.अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
अलिबाग **मंदार मनोहर वर्तक**
दिनांक : २५.०६.२०२६ **मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सूचनाः**
१) वरील सभा गणपूर्ती अभावी तहकूब करावी लागल्यास सदर सभा त्याच दिवशी अर्ध्या तासाच्या अवधीनंतर त्याच ठिकाणी सभेच्या कामकाजास सुरूवात केली जाईल. त्यावेळी गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) सभेच्या वेळी सभासदांना विषयपत्रिकेवरील विषयासंबंधी काही माहिती हवी असेल किंवा सभेपुढे काही सूचना मांडावयाच्या असतील तर त्या लेखी स्वरूपांत दिनांक ०७.०७.२०२६ पर्यंत बँकेच्या केंद्र कार्यालयास मिळतील अशा बेताने पाठवाव्यात.
३) संस्थेमार्फत पाठवावयाचा प्रतिनिधी, सदर संस्थेचा थकबाकीदार नाही अशा आशयाचा दाखला प्रतिनिधीत्वाचे ठरावासोबत आणला पाहिजे. (पोटनियम क्र.२५ (इ) सदर ठरावाचा व प्रमाणपत्राचा नमुना नोटीसीसोबत दिला आहे.)
४) व्यक्तिगत सभासद सभेस हजर राहू शकतील. मात्र त्यांना पोटनियम क्रमांक २४ प्रमाणे अधिकार राहतील.

**(ठरावाचा व प्रमाणपत्राचा नमुना)**

-------------सोसायटी लि.ची पंचकमिटी दिनांक--------२०२६ रोजी झाली. त्या सभेतील ठराव नंबर---------------- ची खरी नक्कल.
ठराव नंबरः-
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दिनांक ११.०७.२०२६ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या संस्थेतर्फे भाग घेण्याचा व मतदान करण्याचा अधिकार श्री.------------------------ यांना देण्यांत येत आहे.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

तारीख : सेक्रेटरी चेअरमन
ठिकाण : ---------------- सोसायटी लिमिटेड
सील :

---------------------------------------------

**-: प्रमाण पत्र :-**

मा.चेअरमन साहेब,
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग-रायगड यांसी
------------------------------- सोसायटी लि.
यांजकडून प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री------------------------
या संस्थेचे सभासद असून ते कसलेही प्रकारचे थकबाकीदार नाहीत.

तारीख चेअरमन
ठिकाण : ---------------- सोसायटी लिमिटेड

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे वायशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-०२-३७ (हे.आर), शेत जमिन मिळकत श्रीमती स्मिता रविंद्रनाथ खेडेकर, राहणार नांदगाव, ता.मुरूड, यांच्या मालकीची असून, सदरील शेत जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले आहे, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर शेत जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र(हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वायशेत, ता.अलिबाग. | १०/७/अ | ०-९२-०० <br> ०-०७-८० पो.ख. <br> ०-९९-८० एकूण | २-०० |

सदरील मिळकतीपैकी श्रीमती स्मिता रविंद्रनाथ खेडेकर यांच्या मालकीची ०-०२-३७ (हे.आर), आकार रू ०.०५ पैसे, ही जमिन मिळकत.

अलिबाग, सही/-
दिनांक : २४/०६/२०२६
**(ॲड.सिद्धार्थ संजय भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

